cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२१७ | गुरूवार दि.०४ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### मोफत योजना अर्थकारणावर बोजाच!

कोणत्याही निवडणुका म्हणजे तत्कालीन सरकारसाठी नवनव्या घोषणांची संधी असते. राज्यात तीन खांबी सरकार आहे. त्यामुळे मतदारांना आकर्षित करून घेणाऱ्या घोषणांचे प्रमाणही तिप्पट झाले नसते तरच नवल. या निवडणुकीमुळे 'लाडक्या बहिणीं'चे नशीब पुन्हा एकदा चमकण्याची शयता आहे.

# सोयाबीन खरेदिच्या मर्यादेमुळे शेतकऱ्यांचे नुकसान

## सुमारे २२ लाख टन सोयाबीन खुल्या बाजारात विकावे लागणार, २९२ कोटींचे नुकसान

पुणे । प्रतिनिधी

**सोयाबीनच्या शासकीय खरेदीकरिता निश्चित करण्यात आलेल्या मर्यादित उद्दिष्टामुळे राज्यातील शेतकऱ्यांना सुमारे २२ लाख टन सोयाबीन खुल्या बाजारात विकावे लागणार आहे. पण खुल्या बाजारात पडत्या दरात सोयाबीन खरेदी होत असल्यामुळे या व्यवहारात शेतकऱ्यांचे तब्बल २९२ कोटी १६ लाख रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता आहे.**



राज्यात ४० लाख टन सोयाबीन उत्पादनाचा अंदाज असून त्यापैकी १८ लाख टन सोयाबीनची खरेदी शासनाकडून होईल. सोयाबीन खरेदीसाठी यंदा महाराष्ट्र राज्य पणन मंडळास अभिकर्ता म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. त्यांच्या माध्यमातूनच खरेदी केंद्रांना मान्यता देण्यात येत आहे. राज्यात २५० वर केंद्रे निश्चित करण्यात आली असली तरी अनेक ठिकाणी ओलावा अधिक असल्याचे सांगत हमीभाव केंद्रांवर सोयाबीन नाकारले जात आहे. राज्यभरात एकूण उत्पादनाच्या केवळ पंचवीस टक्के सोयाबीन खरेदी केली जाणार असून, त्याची खरेदीमर्यादा १८ लाख ५० हजार ७०० टन इतकीच आहे. राज्यात यंदाच्या खरिपात ४७ लाख हेक्टर क्षेत्रात सोयाबीनची पेरणी झाली आहे. म्हणजेच १ कोटी १७ लाख ५० हजार एकर क्षेत्रात सोयाबीनचे उत्पादन होत आहे. पावसाने सोयाबीनचे नुकसान झाले ▶▶ पान २ वर

### बाजार समिती व एफपीसींना अधिकार


सोयाबीनच्या शासकीय खरेदीची केंद्रे पणन मंडळाने बाजार समिती व शेतकरी उत्पादक कंपन्यांना दिले आहेत. १५ नोव्हेंबरपासून प्रत्यक्ष खरेदीस प्रारंभ झाला. त्यापूर्वी केवळ नोंदणी करण्यात आली. एफपीसींना खरेदीचे अधिकार देताना १० किलो मीटरची अट आहे.

# शीतल तेजवानीला अटक पार्थ पवार अडचणीत

## मुंढवा जमीन प्रकरणात मोठी कारवाई

पुणे । प्रतिनिधी

**मुंढवा येथील कोट्यवधींच्या जमीन गैरव्यवहार प्रकरणात अखेर पहिली अटक झाली आहे. या प्रकरणात शीतल किसनचंद तेजवानीला पुणे पोलिसांनी नाट्यमयरित्या ताब्यात घेतले. गेल्या काही दिवसांपासून ती गायब होती, तसेच ती परदेशात गेल्याच्या चर्चाही सुरु होत्या. परंतु पोलिसांनी अचानक तिला अटक करून सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे.**



माहितीनुसार, तेजवानीची आतापर्यंत दोन वेळा सखोल चौकशी झाली होती. त्या चौकशीदरम्यान आर्थिक व्यवहार, दस्तऐवजातील फेरफार आणि जमिनीवरील हक्क दाखवण्यासाठी सादर केलेल्या कागदपत्रांतील अनियमितता उघडकीस आल्याचा दावा तपास पथकाने केला आहे. प्राथमिक पुरावे सापडल्यानंतरच अटकेचा निर्णय घेतल्याचे पोलीस सांगत आहेत. ▶▶ पान २ वर

# अमरसिंह पंडितांच्या हत्येचा कट होता...!

## आमदाराच्या स्वीय सहायकाचा आयसीयुमधून खळबळजनक दावा

बीड । प्रतिनिधी

गेवराईतील राड्यात जखमी झालेले माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे स्वीय सहाय्यक अमृत डावखर यांनी रुग्णालयातील अतिदक्षता विभागातून एका वृत्तवाहिनीशी एक्स्क्लुझिव्ह संवाद साधला. यावेळी, गेवराई येथे मतदानादिवाशी झालेल्या राड्याबाबत त्यांनी सखोलपणे भाष्य करत भाजप नेते आणि माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या कुटुंबीयांवर गंभीर आरोप करत खळबळजनक दावा केला आहे.

गेवराई येथील निवडणुकीदरम्यान पवार आणि पंडित कुटुंबातील सदस्य एकमेकांना भिडले. त्यातून मतदानच्या दिवशी मोठा वाद उफाळून आला. या घटनेत माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### जि.प.निवडणुकीसाठी क्रांतिकारी संघटना सज्ज

बुलडाणाः आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्ये जोरदारपणे उतरून ताकदीचे, नवे व लढाऊ उमेदवार देणार असल्याची घोषणा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक रविकांत तुपकर यांनी केली. बुलडाण्यात झालेल्या संघटनेच्या बैठकीत त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. बैठकीत शेतकरी प्रश्न, संघटनेची भूमिका, आगामी आंदोलन आणि निवडणूक तयारी या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. सोयाबीन, कापूस यांसारख्या पिकांना योग्य हमीभाव मिळत नसल्याने तसेच जंगली जनावरांचा वाढता त्रास, कर्जबोजा आणि पीकविमा यांसारख्या प्रश्नांमुळे शेतकरी आजही संकटात असल्याचे तुपकर यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, शेतकऱ्यांच्या वेदना संपविण्यासाठी आम्ही आतापर्यंत लढलो आहोत आणि पुढेही तितक्याच ताकदीने लढत राहू. महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांची भक्कम चळवळ उभी करायची आहे.

### नव्या आधार अ‍ॅपमधून नाव–पत्ता बदलता येणार

नवी दिल्ली : आता तुम्ही घरबसल्या आधार कार्डमध्ये नोंदणी केलेला मोबाइल नंबर बदलू शकता. सरकारने आधार अ‍ॅपमध्ये ही सुविधा सुरू केली आहे. तसेच, पत्ता, नाव आणि ईमेल आयडी अपडेट करण्याची सुविधा लवकरच सुरू होईल. नवीन डिजिटल सेवेची घोषणा आधारचे नियमन करणाऱ्या युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया या संस्थेने केली आहे. या बदलांसाठी वापरकर्त्यांना कोणत्याही कागदपत्राची आवश्यकता भासणार नाही. अ‍ॅपवर ओटीपी पडताळणी आणि फेस ऑथेंटिकेशनद्वारे सर्व काही बदलता येईल. या सेवेमुळे दुर्गम भागातील लोकांना, ज्येष्ठ नागरिकांना आणि स्थलांतरितांना सोपे होईल.

### छत्तीसगडमध्ये सात नक्षलींचा खात्मा

बिजापूर : छत्तीसगडमधील बिजापूर–दंतेवाडा येथील जंगलात नक्षलवादी आणि सुरक्षा दलांमध्ये बुधवारी चकमक झाली. यात सात नक्षलींना कंठस्नान घालण्यात यश आले असून, सुरक्षा दलांमधील दोन जवानही शहीद झाले आहेत. चकमकीत मृत्यू झालेल्या नक्षलींचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. गंगलूर येथे सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये जोरदार चकमक झाली. बिजापूरचे पोलीस अधीक्षक जितेंद्र यादव यांनी माध्यमांना सांगितले की, सकाळी नऊपासून ही चकमक सुरू झाली आणि संध्याकाळ पर्यंत सात नक्षलींचा मृत्यू झाला. सातही मृतदेह जवानांनी ताब्यात घेतले आहेत. चकमकीच्या ठिकाणाहून एसएलआर रायफल, ३०३ रायफल आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे.

### इम्रान खान जिवंत पण त्यांचा मानसिक छळ

लाहोरः पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या प्रकृतीबद्दलच्या सर्व अफवा आता दूर झाल्या. त्यांच्या भगिनी डॉ. उझमा खान यांनी मंगळवारी रात्री आदियाळा तुरुंगात जाऊन इम्रान यांची प्रत्यक्ष भेट घेतली आणि प्रकृतीची चौकशी केली. इम्रान खान जिवंत आहेत. मात्र एकांतवासात ठेवल्यामुळे त्यांचा मानसिक छळ झाला आहे, असे डॉ. उझमा खान यांनी तुरुंगाबाहेर जमलेल्या पीटीआयच्या कार्यकर्त्यांना सांगितले. इम्रान यांची प्रकृती ठिक असल्याचे दिसते आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. गेल्या महिन्याभरापासून इम्रान खान यांना भेटण्यावर अघोषित बंदी घालण्यात आली होती. त्यांचे वकील, जॉक्टर, पीटीआयचे नेते आणि कुटुंबीयांनाही तुरुंग प्रशासनाने इम्रान यांची भेट घेण्याची परवानगी दिली नव्हती.

### राज्याने केंद्राला प्रस्ताव दोन महिने उशिरा पाठवला

दिल्लीः शेतकऱ्यांसाठी अतिवृष्टीच्या मदतीचा प्रस्ताव केंद्राला पाठवण्यात राज्य सरकारने दोन महिने उशीर केल्याचे उघड झाले आहे. हा मुद्दा लोकसभेत गाजला. अतिवृष्टीनंतर शेतकऱ्यांच्या आर्थिक मदतीसाठी महाराष्ट्र सरकारने कोणताही प्रस्ताव केंद्राकडे पाठवलेला नसल्याचे केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मंगळवारी (दि. २ डिसेंबर) लोकसभेत दिलेल्या उत्तरात म्हटले होते. दरम्यान, मंत्री चव्हाण यांनी यावर लोकसभेत बुधवारी (दि.३ डिसेंबर) खुलासा करत, महाराष्ट्र सरकारने अतिवृष्टी आणि पूरबाधित शेतकऱ्यांच्या मदतीचा प्रस्ताव २७ तारखेला पाठवला असल्याचे सांगितले. तर महाराष्ट्राचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीचा प्रस्ताव गेल्या आठवड्यातच राज्य शासनाने केंद्र सरकारला पाठवला असल्याचे स्पष्ट केले.

# महाराष्ट्रात थंडी वाढली सहा जिल्ह्यांना येलो अलर्ट

पुणे प्रतिनिधी

पुढील काही दिवसांत महाराष्ट्राच्या अनेक भागात मोठ्या प्रमाणावर थंडीचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. विशेषतः उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात तापमानात मोठी घट होण्याची शक्यता आहे. डिसेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत महाराष्ट्रात सरासरीपेक्षा जास्त थंडीचा अनुभव येण्याची शक्यता आहे, या हंगामात कमाल आणि किमान तापमान सामान्य पातळीपेक्षा कमी किंवा त्यापेक्षा कमी राहील. त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी, खबरदारी घ्यावी. जास्त थंडीत बाहेर पडू नये, असे हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे.

येत्या काही दिवसांत मराठवाडा आणि विदर्भात थंडीचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे. सहा जिल्ह्यांना थंडीचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यात नंदूरबार, धुळे, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, ▶▶ पान २ वर

# 'गद्दारांचा बुडबुडा फुटला, आता आपसातच बाचाबाची'

## उद्धव ठाकरेंचा शिंदे शिवसेनेवर हल्लाबोल

मुंबई । प्रतिनिधी

नगरपंचायत आणि नगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत महायुतीच्या नेत्यांवर त्यांच्याच लोकांनी धाडी टाकल्या. हेलिकॉप्टरमधून पैशांच्या बॅगा कशा नेत होत्या, हे संपूर्ण राज्याने पाहिले आहे. आता या गद्दारांचा बुडबुडा फुटला असून, त्यांच्यातच बाचाबाची सुरु झाली आहे,



अशा शब्दांत उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महायुती सरकारवर थेट निशाणा साधला. ''शिवसेनेचा अस्सल भगवा झेंडा आपल्याला दिसायला हवा. भगव्यावर आता कोणतेही चिन्ह नको. फक्त छत्रपती शिवाजी महाराजांचा भगवाच आता दिसायला हवा, असे आवाहनही त्यांनी बुधवपारी (दि. ३ डिसेंबर) ▶▶ पान २ वर

# राज्याच्या पोलीस महासंचालकपदी सदानंद दाते

मुंबई । प्रतिनिधी

वरिष्ठ आयपीएस अधिकारी सदानंद दाते यांची महाराष्ट्राच्या पोलिस महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यमान पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला या ३१ डिसेंबर २०२५ रोजी निवृत्त होत आहेत. राज्य सरकारकडून सात अधिकाऱ्यांची नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाकडे पाठवली होती. त्यामध्ये सदानंद दाते यांचे नाव सर्वाधिक चर्चेत होते. सदानंद दाते सध्या राष्ट्रीय तपास यंत्रणेचे (एनआयए) महासंचालक आहेत.




सदानंद दाते हे १९९० च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. महाराष्ट्र केडरचे अधिकारी असलेले सदानंद दाते हे सध्या राष्ट्रीय तपास यंत्रणा महासंचालकपदी कार्यरत आहेत. त्याआधी ते राज्याच्या दहशतवादविरोधी पथकाचे (एटीएस) प्रमुख तथा डीजीपी होते. नवनिर्मित मीरा–भाईंदर पोलीस आयुक्तालयाचे पहिले पोलीस आयुक्त म्हणूनही दाते यांनी ▶▶ पान २ वर

# पुतिनच्या स्वागतासाठी दिल्ली लॉकडाऊन सदृश्य

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन चार वर्षांनंतर भारताच्या दौऱ्यावर येत असल्याने दिल्लीमध्ये सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात येणार आहे. ४ आणि ५ डिसेंबरला होणाऱ्या या दोन दिवसीय भेटीसाठी राजधानीला अक्षरशः किल्ल्याचे रूप येणार आहे. पुतिन यांच्यासोबत येणाऱ्या १३० सदस्यीय प्रतिनिधी मंडळामुळे सुरक्षा यंत्रणा पूर्ण सतर्क मोडवर आहेत. ▶▶ पान २ वर



# राज ठाकरेंनी घेतली संजय राऊतांची भेट; दिला हा मनसे सल्ला


मुंबई । प्रतिनिधी

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी संजय राऊत यांच्या 'मैत्री' या निवासस्थानी जाऊन त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. या भेटीत ठाकरे आणि राऊत यांच्यात नेमकी काय चर्चा झाली याबाबतची माहिती संजय राऊत यांचे बंधू आमदार सुनील राऊत यांनी माध्यमांशी बोलतांना दिली.

ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांना काही दिवसांपूर्वी गंभीर आजाराचे निदान झाले होते. त्याबाबतची ▶▶ पान २ वर



# पंडित विरुद्ध पवार वाद नवा नाही; अध्याय नवा!







बीड । सुभाष चौरे

**नगरपालिका निवडणुकीत पंडित पवार कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या हाणामाऱ्या, दगडफेक हा विषय काही नवा नाही. त्याला १९८५ मधील निवडणूक आणि त्याचा निकाल १९० मताने झालेला जय – पराजय ही कारणे आहेत. यामुळे गेवराई येथे पंडित विरुद्ध पवार हा मंगळवारी झालेला वाद काही नवा नाही, फक्त नवा अध्याय सुरू झाला आहे एवढेच.**

राज्यामध्ये नगरपंचायत नगरपालिका निवडणुका २ डिसेंबर रोजी झाल्या. मतमोजणी लांबली असली तरी राज्यांमध्ये गाजली ती फक्त गेवराई नगरपंचायत. माजी राज्यमंत्री शिवाजीराव पंडित आणि गेवराईचे पाटील शाहूराव जाधव हे नाव जिल्ह्यासाठी नवीन नाही, जुनेच आहे. परंतु त्यांचा इतिहास पाहिला तर मंगळवारी झालेली घटना काही नवीन नाही ते होतच होते फक्त या वादाचा नवीन अध्याय आता सुरू झाला आहे. आत्ताच्या नगरपालिकेत नगराध्यक्षासाठी स्थानिक आमदार पंडित विरुद्ध त्यांचेच सोयरे बदामराव पंडित, बाळराजे पवार यांच्यात लढत आहे. राज्यात राष्ट्रवादी विरुद्ध भाजप या वादाचा अर्थ इथे लावला जात असला तरी तो येथे पुर्णपणे लागू पडत नाही. कारण इथला वाद काही नवीन नाही तो जुनाच आहे. फक्त आता त्याला चालना मिळाली यापेक्षा वेगळे काहीही ▶▶ पान २ वर







### १९० मतांनी केला होता पंडितांचा पराभव

पंडित – पवार राजकीय वैर सुरू झाले ते १९८५ मध्ये माधवराव पवार विरुद्ध शिवाजीराव पंडित अशी निवडणूक झाली तेव्हापासून. त्याकाळी ही निवडणूक अटीतटीची होती आणि त्या निवडणुकीमध्ये १९० मताने शिवाजीराव पंडित यांचा पराभव झाला आणि माधवराव पवार विजयी झाले. तेथून पुढे राजकीय वैर सुरू झाले होते.

### आबा होते दादाचे कट्टर समर्थक

पंडित अन् शिवाजीराव दादा पंडित असे राजकीय समीकरण असायचे. आबा हे पूर्वी शिवाजीराव दादा पंडित यांचे कार्यकर्ते असायचे. त्याचदरम्यान पंचायत समितीचे सभापतीपद न दिल्यामुळे बदामराव पंडित वेगळे झाले. त्यानंतर ते दादा, भैय्या यांचा पराभव करून दोनदा आमदार झाले, मंत्रीही झाले. आबा फुटले ते केवळ कार्यकर्त्याला पद दिले नाही म्हणून अशी चर्चा तालुक्यात आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०१ डिसेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः २०.०० क्विंटल | २,४३० | ३,०३१ | २,७५६ |
| ज्वारी/हायब्रिड : ४२.०० क्विंटल | १,८०० | ३,२३० | २,७४९ |
| मका/लोकलः ७.०० क्विंटल | १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर : ३.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद :१८.०० क्विंटल | ३,५०० | ५,१६० | ४,६१५ |
| बाजरीः १९.५० क्विंटल | २,६०० | ३,२०० | २,९५० |
| मुगः २.५० क्विंटल | ६,८०१ | ७,२०१ | ७,००१ |
| सोयाबीनः १७५.५० क्विंटल | ३,६०० | ४,५५० | ४,३६४ |
| हरभराः १.०० क्विंटल | ५,२०० | ५,२०० | ५,२०० |

cmyk

अग्रलेख

# मोफत योजना अर्थकारणावर बोजाच !

कोणत्याही निवडणुका म्हणजे तत्कालीन सरकारसाठी नवनव्या घोषणांची संधी असते. राज्यात तीन खांबी सरकार आहे. त्यामुळे मतदारांना आकर्षित करून घेणाऱ्या घोषणांचे प्रमाणही तिप्पट झाले नसते तरच नवल. या निवडणुकीमुळे 'लाडक्या बहिणीं'चे नशीब पुन्हा एकदा चमकण्याची शयता आहे. राज्यात येत्या दोन वर्षात एक कोटी लखपती दीदी बनवणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे. 'लखपती दीदी' ही केंद्र सरकारची योजना असून त्याची अंमलबजावणी राज्य सरकारे करतात.

कोणतीही योजना, मग ती केंद्र अथवा राज्य सरकारची असो, कागदोपत्री उत्तमच असते. पण तिचा प्रभाव, शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत लाभ पोहोचणे मात्र अंमलबजावणीवर आणि अंमलबजावणी सरकारी बाबूंच्या काम करण्याच्या मानसिकतेवर अवलंबून असते. अनेक योजनांचे घोडे इथेच पेंड खाऊ शकते. जसे सध्या राज्याच्या लाडकी बहीण योजनेचे झाले आहे. एकीकडे ही योजना बंद केली जाणार नाही, असे राज्याचे तीनही कारभारी छातीठोकपणे सांगत असले तरी दुसरीकडे त्यात झालेला भ्रष्टाचार हा दखलपात्र मुद्दा बनला आहे. विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. या योजनेचा गैरफायदा अनेकींनी आणि अनेकांनीही घेतल्याचे उघड झाले आहे. या योजनेची ई-केवायसी प्रक्रिया सुरू झाली तेव्हा सरकारी खजिन्यावर कोणी कोणी डल्ला मारला हे उघड व्हायला सुरुवात झाली. त्यात हजारो सरकारी कर्मचारी देखील सहभागी होते. विशेष म्हणजे, कागदावरील अनेक लाडक्या बहिणी वास्तवात मात्र लाडके भाऊ देखील होते. म्हणजे अनेक पुरुष सरकारी कर्मचारी देखील या योजेनचा लाभ घेत होते किंवा घेत आहेत. आतापर्यंत सुमारे पाच लाख अपात्र बहिणींना या योजनेतून वगळण्यात आल्याचे सांगितले जाते. बोगस लाभार्थ्यांकडून पैसे वसूल करणार असल्याचे सरकारने अनेकदा जाहीर केले. ते कसे, हेही सांगायला हवे होते. किंवा आतापर्यंत किती पैसे वसूल केले गेले हे जाणून घेणे हा करदात्यांचा हक्क आहे. कारण सरकारी पैशाला भ्रष्टाचारी त्यांची खासगी संपत्ती मानतात. सरकारी पैशाला कोणीच वाली नसतो असाच त्यांचा समज असतो. त्यामुळे दिले गेलेले पैसे वसूल करणे किती अवघड असते हेही संबंधित नक्कीच जाणून असतील. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत 'लाडकी बहीण' योजेनचे ई-केवायसी सुरू राहणार आहे. म्हणजेच बोगस लाभार्थ्यांचा आकडा वाढू शकेल. आतापर्यंत सुमारे सव्वा कोटी लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया पूर्ण केली असून सुमारे एक कोटी बहिणींची बाकी आहे. त्यातही उणिवा नसतील कशावरून? अनेक लाडक्या बहिणी अशिक्षित व स्वतः ही प्रक्रिया पूर्ण करण्यास असमर्थ असू शकतील. त्यांचे ई-केवायसी नियमाप्रमाणे कसे केले जाणार आहे? म्हणजेच त्यांचे ई - केवायसी मध्यस्थांवर अवलंबून आहे ही देखील उणीवच मानली जाऊ शकेल. उदाहरणार्थ, यासाठी जी कागदपत्रे आधार मानली जातात त्यांची सत्यता हा वादाचा विषय ठरू शकेल. आधारकार्डच्या आधारे दिले गेलेले जन्म-मृत्यूचे संशयास्पद दाखले रद्द करण्याचे आदेश सरकारने दिले, हे त्याचे चपखल उदाहरण ठरू शकेल. एकुणात काय, तर निवडणुकीतील विजयासाठी योजना घाईगर्दीत जाहीर केल्या जातात आणि नंतर त्यांना नियमांच्या चौकटीत बसवले जाते असाच याचा स्पष्ट अर्थ आहे. पात्र महिलांनाच लाभ मिळावा असाच ई- केवायसी मागचा उद्देश असल्याचे सरकारने सांगितले आहे. पण, मुळात कोणतीही योजना बनवतानाच तिचा लाभ पात्र लाभार्थ्यांनाच मिळावा व त्यात गैरप्रकार घडू नयेत इतकी निर्दोष का बनवली जात नाही? की त्यात जाणीवपूर्वक उणिवा ठेवल्या जात असाव्यात? अशा योजनांमुळे सरकारी तिजोरीवर अतिरिक्त ताण येणेही स्वाभाविकच. तशी सर्वेक्षणे आणि त्यांचे निष्कर्ष सध्या चर्चेत आहेत.

मुळात कोणतीही मोफत योजना अर्थकारणावर बोजाच ठरते; पण त्यातील अपात्रांनी केलेली लुटालूट हे ओझे आणखीच वाढवते. हा खऱ्या लाभार्थ्यांवर अन्याय देखील मानला जाऊ शकेल. अनेक पात्र लाडक्या बहिणींनी सरकारी मदतीच्या आधारे छोटे छोटे व्यवसाय सुरू केल्याचे सांगितले जाते. अशा महिलांच्या प्रतिक्रिया अधूनमधून प्रसिद्ध देखील होतात. पण योजनांच्या आराखड्यातील उणिवा योजनांचे बारा वाजवतात. भ्रष्टाचाराला वाव देतात. लखपती दीदींचे तसे होणार नाही कशावरून?

## मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त पाटोदा पत्रकारांची आरोग्य तपासणी शिबिर





पाटोदा । प्रतिनिधी

**मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त पाटोदा तालुका पत्रकार परिषदेतर्फे ग्रामीण रुग्णालय, पाटोदा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. तालुक्यातील विविध माध्यमांतील पत्रकारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत हृदयविकार तपासणी, रक्तदाब, साखर, हिमोग्लोबिन यांसह विविध आरोग्य तपासण्या करून घेतल्या.**

ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. अभिषेक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांनी तपासण्या करून आवश्यक सल्ला दिला. बदलती जीवनशैली, ताणतणावाचे व्यवस्थापन आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व याबाबतही डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. पत्रकार आपल्या कामाच्या धावपळीत आरोग्याकडे दुर्लक्ष करतात, अशा उपक्रमामुळे योग्य आरोग्य जागरूकता निर्माण होते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. खाडे, डॉ. तागड, डॉ. ओमासे मॅडम, डॉ. सबिया मॅडम, भागवत गर्जे, परिचारिका, चौले (बडे) मॅडम, डोरले मॅडम ,बांगर,सानप,राख, ससाणे मामा, तात्या नागथाई तसेच ग्रामीण रुग्णालयातील सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास मराठी पत्रकार परिषदेचे जेष्ठ पत्रकार छगन मुळे, जिल्हा उपाध्यक्ष कादर मकराणी, इद्रीस चाऊस, दयानंद सोनवणे, श्रीरंग लांडगे, सचिन पवार, डिगंबर नाईकनवरे, तालुकाध्यक्ष अजय जोशी, सचिव हमीदखान पठाण, हल्ला कृती समितीचे तालुकाध्यक्ष संजय सानप, उपाध्यक्ष अशोक भवर, जावेद शेख, अनिल गायकवाड, शहराध्यक्ष सय्यद फय्याज, सलीम शेख, पवन भोकरे, सय्यद इम्रान, डिजिटल मीडिया उपाध्यक्ष डॉ. हरिदास शेलार, दत्ता देशमाने यांसह अनेक पत्रकार बांधव उपस्थित होते. उपक्रमाला मिळालेल्या प्रतिसादामुळे पुढील काळात अशा उपयुक्त उपक्रमांचे आयोजन करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

## आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे ग्राम दरबार कार्यक्रम उत्साहात पार

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण ग्रामपंचायत व पंचायत समिती, आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने ''एक दिवस गावकऱ्यासोबत'' ग्राम दरबार कार्यक्रम उत्साहात आयोजित करण्यात आला. प्रशासन व ग्रामस्थांमध्ये थेट संवाद साधण्याचा आणि विविध शासकीय योजनांची माहिती तसेच लाभ वितरण करण्याचा हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने आणि उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते महात्मा गांधी व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. यानंतर ग्रामस्थांच्या वतीने सर्व मान्यवरांचे पारंपरिक स्वागत व सत्कार करण्यात आले. ग्राम दरबारात विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते. गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने, विस्तार अधिकारी बी.जे. जायभाय, एन.डी. शिंदे, नितीन राऊत, शाखा अभियंता भावर, महिला व बालविकास विभागाच्या सुपरवायझर ए.बी. ससाने, तसेच बचत गट विभागातील (उमेद) मंगल हजारे आणि डॉ. सुचित्रा तळेकर यांनी आपल्या विभागातील योजनांची सविस्तर माहिती ग्रामस्थांना दिली. यामध्ये,बालविकास विभागामार्फत प्रधानमंत्री मातृवंदना योजना, लेक लाडकी योजना, बालसंगोपन, बचतगट



मार्फत राबवले जाणारे विविध योजना, आरोग्य विषयी योजना,वृक्षारोपण, घरकुल योजना, जलसिंचन विहीर, शेततलाव, वृक्षलागवड, शेळीपालन शेड, गायी-गोठा बांधकाम अशा अनेक वैयक्तिक लाभ योजनांचा समावेश होता. गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने यांनी ग्रामस्थांच्या अडचणी शांतपणे ऐकून घेतल्या आणि अनेक समस्यांचे तात्काळ निराकरण केले. त्यांनी मनरेगा अंतर्गत मिळणाऱ्या कामांसाठी जॉब कार्ड व प्रक्रिया अनिवार्य असल्याचे सांगत विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी पूर्ण करण्याचे महत्व स्पष्ट केले. तसेच पंचायत समितीमार्फत उपलब्ध असलेल्या विविध सुविधा व कल्याणकारी योजनांची माहितीही दिली. सांगवी पाटण ग्रामपंचायतने शासनाच्या विविध योजनांचे गरजू लाभार्थ्यांना दिलेल्या लाभाचे कौतुक सर्व अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. विशेषतः वृक्षारोपण उपक्रम उत्कृष्टरीत्या राबवल्याबद्दल ग्रामपंचायत, ग्रामसेवक, ग्रामरोजगार सहाय्यक आणि सर्व ग्रामस्थांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच मुख्यमंत्री समृद्ध गाव अभियानात सक्रिय सहभाग घेण्याचे आव्हान ग्रामस्थांना देण्यात आले. या प्रसंगी राजू भोसले यांनी मनोगत व्यक्त करताना ग्रामासाठी नवीन योजनांची आवश्यकता अधोरेखित केली आणि कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल सर्व अधिकाऱ्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर शेख यांनी केले, तर सरपंच दत्तात्रय खोटे यांनी उपस्थित मान्यवर, कर्मचारी, महिला बचत गट, अंगणवाडी सेविका तसेच ग्रामस्थांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता केली. या ग्राम दरबार प्रसंगी ग्राम विस्तार अधिकारी आजबे, के .के आगाशे, सरपंच दत्तात्रय खोटे, ज्ञानेश्वर भोसले, राजाभाऊ भोसले, महेश भगत, लक्ष्मण भोसले, बाबासाहेब भोसले, शेषराव भोसले, भागवत बोराडे, किरण खिलारे, समाजसेवक तथा शिवरायांचा मुस्लिम मावळा समीर शेख, महिला बचत गटातील सदस्य, अंगणवाडी सेविका आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमामुळे ग्रामीण भागातील प्रशासनाचा थेट संपर्क वाढला असून सांगवी पाटणचे ग्रामस्थ याला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन ग्राम दरबार यशस्वी केला.

## दिव्यांगांच्या पदसुनिश्चितीसाठी तज्ज्ञ समितीची पुनर्रचना-सचिव तुकाराम मुंढे

### प्रक्रियेसाठी एकसमान कार्यपद्धती निश्चित

मुंबई । प्रतिनिधी

**दिव्यांग व्यक्तींना शासकीय, निमशासकीय सेवेत नियुक्ती आणि पदोन्नतीमध्ये चार टक्के आरक्षणाचा कायदेशीर हक्क प्रभावीपणे मिळावा, यासाठी पदसुनिश्चिती प्रक्रियेसाठी एकसमान कार्यपद्धती (एसओपी) तयार केली आहे. पदसुनिश्चिती प्रक्रिया अधिक शास्त्रीय आणि पारदर्शक करण्याच्या हेतूने तज्ज्ञ समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो दिव्यांग उमेदवारांसाठी रोजगार, सर्व स्तरांवर समान संधी सुनिश्चित होण्यास मदत होणार असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले.**

सचिव तुकाराम मुंढे म्हणाले, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पदसुनिश्चिती प्रक्रियेसंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. शासकीय, निमशासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच स्वायत्त संस्था आणि महामंडळांमधील मंजूर पदांचा सखोल आढावा घेऊन दिव्यांग व्यक्ती कोणत्या पदांवर कार्यक्षमतेने काम करू शकतील, हे ओळखणे आता बंधनकारक राहणार आहे. प्रत्येक मंत्रालयीन विभागात यासाठी तज्ज्ञांचा समावेश असलेली समिती स्थापन करेल. प्रत्येक मंत्रालयीन विभागाच्या या समितीत अंध-अल्पदृष्टी, श्रवणदोष, अस्थिव्यंगता, स्वमग्नता, विशिष्ट शिक्षण अक्षमता व मानसिक आजार अशा विविध प्रवर्गांतील किमान एका तज्ज्ञाचा समावेश असेल. समितीचे अध्यक्ष त्या विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव राहतील. समिती सहाय्यक तंत्रज्ञानातील विकास, जागतिक रोजगार मानके आणि पदांच्या जबाबदारीचे स्वरूप लक्षात घेऊन विभागातील पदांची योग्यतापरीक्षण करण्यासोबतच पदसाखळीतील सर्व स्तरांचा विचार करून पदसुनिश्चिती प्रस्ताव सादर करणार आहे. दिव्यांगांसाठी सुयोग्य नसलेल्या पदांना सूट दिली जात असल्यास, ती जास्तीत जास्त तीन वर्षेच वैध राहणार असून त्याचे पुनरावलोकन अनिवार्य असल्याचे सचिव मुंढे यांनी सांगितले. सचिव मुंढे म्हणाले, प्रत्येक विभागाने दरवर्षी १ जानेवारी रोजी पदसुनिश्चितीची अद्ययावत स्थिती त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे आणि तिची प्रत आयुक्त, दिव्यांग कल्याण तसेच दिव्यांग कल्याण विभागास सादर करणे बंधनकारक राहील. तसेच सरळसेवा भरती व पदोन्नती करताना संबंधित भरती यंत्रणेकडे तीन वर्षात एकदा पदसुनिश्चितीचा आढावा घेतल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. याबाबतचा शासन निर्णय दिव्यांग कल्याण विभागाने निर्गमित केला असून महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## पान १ वरून...

### सोयाबीन खरेदिच्या मर्यादेमुळे

असून राज्याची उत्पादनाची सरासरी एकरी चार क्विंटल असल्याचे कृषी विभागाने म्हटले आहे. शासकीय केंद्रांवर ५ हजार ३२८ रुपये प्रतिक्विंटल हमीदराने खरेदी केली जाणार असून राज्यात यंदा ९८ कोटी ६० लाख रुपयांची सोयाबीन खरेदी होणार आहे. उर्वरित २२ लाख टन सोयाबीन शेतकऱ्यांना खुल्या बाजारात विकावे लागणार आहे. खुल्या बाजारात सध्या सरासरी चार हजार रुपये क्विंटल दर असून या व्यवहारात शेतकऱ्यांचे प्रतिक्विंटल १३२८ रुपयांचे नुकसान होत आहे. त्यातून शेतकऱ्यांचे २९२ कोटी रुपयांचे नुकसान होणार आहे.

---------------

### अमरसिंह पंडितांच्या

स्वीय सहाय्यक अमृत डावखर यांना जबर मारहाण झाली. सध्या त्यांच्यावर बीडमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याच दरम्यान बोलताना डावकर यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या हत्येचा कट पवार कुटुंबाने रचल्याचा खळबळजनक दावा केला आहे. गेवराईमध्ये मारहाणीची घटना ज्यावेळेस घडली, त्यावेळी मी गेवराईमधील कार्यालयात होतो. याच दरम्यान माजी आमदार लक्ष्मण पवार यांचे भाऊ बाळराजे पवार यांच्यासह पाच ते सहा जण तिथे आले, ते सर्वजण अमरसिंह पंडित यांच्या खुनाच्या इराद्याने तिथे आले होते. गुंड प्रवृत्तीचे लोक त्यांच्यासोबत होते, त्यांची गाडी त्यांनी थेट आमच्या कार्यालयावर आदळली. त्यानंतर, तिथे आल्यानंतर अमरसिंह पंडित यांना संपवून टाकायचं असे त्यांनी म्हटलं, ते नाहीत म्हणून मला संपवून टाकू असेही त्यांनी म्हटल्याचा खळबळजनक आरोप डावखर यांनी केला आहे. तसेच, काठी, बेल्ट, लाथ्या, बुक्याने मला मारहाण केली, असेही त्यांनी सांगितले. पवारांनी १९९७ मध्ये तत्कालीन शिवसेना तालुकाप्रमुखाचा खून केला होता, याच प्रकरणात त्यांनी १४ वर्षे तुरुंगात शिक्षा भोगली, सध्या शिक्षा भोगून ते बाहेर आले आहेत. बाहेर आल्यानंतर त्यांचे वर्तन गैर आहे, मला बचाव करण्याची संधी दिली नाही. मला त्यांनी जिवंत मारलं असते, पण आमचा ड्रायव्हर मध्ये आला. आणखी इतर काही जण जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिस जबाब घेतील, या लोकांची जागा कारागृहात आहे. माझा संबंध नसताना मला मारहाण करण्यात आली, केवळ मतदान केंद्रावर बाचाबाची झाली आणि हा वाद उफाळून आल्याची माहिती अमृत डावखर यांनी दिली.

**गेवराईत ५५ जणांवर गुन्हा दाखल...**

गेवराई नगरपालिका निवडणुकी दरम्यान भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झालेल्या राडा प्रकरणात गेवराई पोलिसांनी ५५ जणांविरोधात गुन्हा नोंदवला आहे. नगरपालिका मतदान प्रक्रिये दरम्यान विद्यमान आमदार विजयसिंह पंडित आणि माजी आमदार लक्ष्मण पवार कुटुंबातील सदस्य एकमेकांमध्ये भिडले होते. त्यामुळे गेवराई शहरात मोठा गोंधळ उडाला होता. या प्रकरणात पोलिसांनी स्वतः फिर्यादी होत ५५ जणांविरोधात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियमांचा उल्लंघन केल्याप्रकरणी बीएनएस १६३ २२३ १८९ इतर कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. यामध्ये पवार आणि पंडित कुटुंबातील सदस्यांचा समावेश आहे.

---------------

### शीतल तेजवानीला

मुंढवा प्रकरणाशी संबंधित बावधन आणि खडक पोलिस ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे तेजवानी विरोधात दाखल आहेत. खडक येथील गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला असून आता या तपासाचा वेग आणखी वाढण्याची शक्यता आहे. ईओडब्ल्यूकडे गेल्यानंतर या प्रकरणातील आर्थिक व्यवहाराचे स्रोत आणि संबंधित कंपन्यांचा तपास अधिक बारकाईने होणार आहे. या संपूर्ण प्रकरणात सर्वाधिक चर्चेत असलेला मुद्दा म्हणजे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा पुत्र पार्थ पवार याच्याशी संबंधित 'अमेडिया' कंपनीचे नाव. या कंपनीचा काही दस्तऐवजांमध्ये संदर्भ आढळल्याने तपास पथकाने सांगितले. अद्याप कंपनी विरोधात कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसली, तरी चौकशी होऊ शकते. शीतल तेजवानीच्या अटकेनंतर या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. पुढील काही दिवसांत आणखी महत्त्वाचे खुलासे होण्याची शक्यता तपास पथकाने व्यक्त केली असून, मुंढवा जमीन व्यवहारातील संपूर्ण जाळे आता उघडे पडण्याची चिन्हे दिसत आहेत.

---------------

### राज्याच्या पोलीस महासंचालकपदी

काम पाहिलेले आहे. २६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात त्यांच्या कामगिरीमुळे अनेकांचे प्राण वाचले आहेत. त्यावेळी दाते यांना दहशवाद्यांनी झाडलेल्या गोळ्या लागल्या होत्या. मात्र त्यांनी काही पोलिसांसह दहशतवाद्यांचा सामना केला. त्याबद्दल त्यांना राष्ट्रपती शौर्यपदकाने गौरविण्यात आले होते. प्रामाणिक आणि सचोटीचे अधिकारी म्हणून अधिकारी सदानंद दाते यांची ओळख आहे. सदानंद दाते यांनी आतापर्यंत आर्थिक गुन्हे शाखा, सायबर क्राईम, रेल्वे पोलीस, नवी मुंबई पोलीस अधीक्षक या पदांवर काम केले आहे. त्यांच्या नेतृत्वात ब्लॅक कॅट कमांडोंनी अनेक ऑपरेशन्स यशस्वी पूर्ण केले आहेत. मुंबईवर दहशतवादी हल्ला करणाऱ्या अजमल कसाबला फाशी देण्यासाठी अर्थररोड तुरुंगातून पुण्यातील येरवडा तुरुंगात घेऊन जाण्याची महत्त्वाची जबाबदारी देखील त्यांनी यशस्वी पूर्ण केली आहे. त्यांचा जन्म १४ डिसेंबर १९६६ रोजीचा आहे. त्यांची डीजीपीपदी नियुक्ती झाल्यास १९९१ च्या बॅचचे अधिकारी दाते यांच्यासाठी ती वाढदिवसाची भेट मानली जात आहे. त्यांचा कार्यकाळ डिसेंबर २०२६ पर्यंत असेल.

----------

### महाराष्ट्रात थंडी वाढली

पुणे या जिल्ह्यांचा समावेश आहे. त्यामुळे इथल्या नागरिकांनी खबरदारी घ्यावी. विशेषतः वृद्ध, लहान मुले आणि आरोग्य समस्या असलेल्या लोकांना खबरदारी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. पश्चिम महाराष्ट्रात थंडीची तीव्रता वाढली आहे, पुणे आणि घाटमाथ्यावर शीतलहरीचा इशारा आणि येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. कोल्हापूरमध्ये, किमान तापमान १६ सेल्सिअसच्या आसपास राहू शकते. सातारा आणि सांगली जिल्ह्यातही तापमानात मोठी घट असून हुडहुडी भरली आहे. सकाळच्या वेळेस सर्वत्र धुक्याची चादर बघायला मिळते आहे. मराठवाड्यातही तापमानात लक्षणीय घट होत आहे, ज्यामुळे थंडी वाढली आहे. नाशिकमध्ये सर्वात मोठी घसरण नोंदली गेली असून, त्याठिकाणी यलो अलर्ट देण्यात आला आहे. विदर्भातही थंडीची तीव्रता वाढत आहे. नागपूरमध्ये धुके आणि अंशतः ढगाळ हवामान राहण्याची शक्यता आहे. विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्येही तापमानात सातत्याने घट होत आहे.

-----------

### 'गद्दारांचा बुडबुडा फुटला,

माध्यमांशी बोलताना केले.

उद्धव ठाकरे म्हणाले, मागील दोन-चार वर्षांत आपण ज्या पेगासस स्पायवेअरबद्दल ऐकत होतो, त्याचे नाव बदलून आता संचार साथी ठेवण्यात आले आहे. केंद्र सरकारने आपल्याच लोकांवर अविश्वास दाखवायला सुरुवात केली आहे. दहशतवाद्यांवर लक्ष ठेवण्याऐवजी ते सामान्य जनतेवर पाळत ठेवत आहेत, असा आरोपही त्यांनी केला. एकीकडे हे सुरू असताना आणि निवडणूक सुरू असताना सत्ताधारी पक्षाचीच लोकं त्यांच्यावर धाडी टाकत आहेत. हेलिकॉप्टरमधून पैशांच्या बॅगा कशा नेत होत्या, हे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले आहे. या सर्व घोटाळ्यांमुळे आता सगळेजण जागे होत आहेत. पुढील महिन्यात महानगरपालिका निवडणूक जाहीर होईल. शिवसेनेचा अस्सल भगवा झेंडा आपल्याला दिसायला हवा. भगव्यावर आता कोणतेही चिन्ह नको आहे. फक्त छत्रपती शिवाजी महाराजांचा भगवाच आता दिसला पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

------------

### राज ठाकरेंनी घेतली संजय

माहिती स्व:त राऊत यांनी सोशल मीडियावरून दिली होती. त्यांना डॉक्टरांनी सक्तीच्या विश्रांतीचा सल्ला दिला होता. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून राऊत हे सार्वजनिक जीवनापासून दूर होते. सोमवारी त्यांनी माध्यमांशी संवाद देखील साधला होता. त्यावेळी त्यांनी तोंडाला मास्क लावल्याचे दिसून आले होते. यामुळे अजूनही ते पूर्णपणे बरे झाल्याचे दिसत नाही. आमदार सुनील राऊत यावेळी म्हणाले, संजय राऊत आजारी असल्यापासून राज ठाकरे सतत माझ्या संपर्कात होते. ते सातत्याने त्यांच्या तब्येतीची विचारपूस करत होते. संजय राऊतांना यूएसला नेले पाहिजे की अन्य काही केले पाहिजे, याबाबत ते माझ्याशी बोलत होते. तब्बल २० वर्षांनंतर राज ठाकरे आमच्या घरी आले, त्यामुळे आम्हाला खूप आनंद झाला. त्या दोघांमध्ये जवळपास २५ ते ३० मिनिटे चर्चा झाली. यावेळी राज ठाकरेंनी राऊत यांना ज्या प्रकारचा तुझा आजार आहे त्यानुसार तुला राहावे लागेल. लोकांमध्ये न जाता दीड-दोन महिने आराम करावा, असा सल्ला त्यांनी दिल्याचे सुनील राऊत यांनी सांगितले. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि खासदार संजय राऊत यांची मंगळवारी मुंबईत राजेश नार्वेकर यांच्या मुलाच्या लग्न सोहळ्यात भेट झाली होती. यावेळी दोघांमध्ये जवळपास २० मिनिटे चर्चा झाली. यावेळी मंत्री आशिष शेलार देखील उपस्थित होते. यापुर्वी शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी संजय राऊत यांच्या भांडूप येथील 'मैत्री' बंगल्यावर जाऊन त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली होती.

--------

### पुतिनच्या स्वागतासाठी दिल्ली

पुतिन हे भारत-रशिया २३ वे वार्षिक शिखर संमेलन अटेंड करण्यासाठी येत आहेत. ते ४ डिसेंबरला दिल्लीमध्ये पोहोचतील. त्याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत खासगी डिनर आणि द्विपक्षीय चर्चा होईल. ५ डिसेंबरला बिझनेस मिटिंग्स आणि राजकीय डिनर (स्टेट बँक्वेट) आयोजित करण्यात आला आहे. दिल्लीला 'नो-रिस्क झोन' घोषित करून बहुस्तरीय सुरक्षा रिंग तयार करण्यात आली आहे. रशियाची ५० हून अधिक सदस्यांची ॲडव्हान्स सिक्युरिटी टीम आधीच दिल्लीमध्ये दाखल झाली आहे. त्यांनी पुतिन यांच्या मार्गांचा, कार्यक्रम स्थळांचा आणि सुरक्षा व्यवस्थेचा तपशीलवार आढावा घेतला आहे. पुतिन यांच्या वैयक्तिक सुरक्षा पथकात ५०+ प्रशिक्षित कमांडो आहेत. त्यांचे अन्न, उपकरणे आणि सुरक्षा साहित्य रशियातूनच येणार आहे. त्यांच्या हॉटेल आणि वाहनांसाठी पोर्टेबल सुरक्षा प्रणाली उभारण्यात आली आहे. पुतिन यांच्या ताफ्याच्या मार्गावर ट्रॅफिक डायव्हर्जन लागू केले जाईल. दिल्ली पोलिसांचे पथक या सर्व हालचालींवर नजर ठेवत आहे. स्वच्छता, तपासणी आणि 'एरिया सॅनिटायझेशन' आधीच पूर्ण झाले आहे. पुतिन कुठे थांबणार हे सुरक्षा कारणास्तव गुप्त ठेवण्यात आले आहे. नुकत्याच दिल्लीमध्ये झालेल्या स्फोटानंतर सुरक्षेची संवेदनशीलता अधिकच वाढली आहे. या पार्श्वभूमीवर पुतिन यांच्या भेटीसाठी विशेष प्रोटोकॉल लागू करण्यात आले आहेत. गुप्तचर संस्थाही संभाव्य धोक्यांवर सतत नजर ठेवून आहेत.

-----------

### पंडित विरुद्ध पवार वाद

नाही. पंडित आणि पवार कुटुंबातील अंतर्गत वाद हा सर्व तालुक्याला ठाऊक आहे. परंतु हा वाद मिटवण्याचे प्रयत्न केले ते गेवराईतील पाटील म्हणून संबोधले जाणारे शाहूराव पवार यांनी. गेवराई शहरामध्ये वलय असले तरी तालुक्यामध्ये एक चांगला माणूस तयार होत आहे, हे शिवाजीराव दादा पंडित यांच्याकडे पाहिले जात होते. पवार - पंडितांचे वैर होतेच पण त्यातही शाहूराव पवार यांनी मध्यस्थी करत पंडित पवार यांचे जिव्हाळ्याचे संबंध जुळवून आणले. यासाठी आपल्या घरातील लेक पंडितांच्या घरात दिली. त्यावरून हा राजकीय वाद कमी होईल हीच अपेक्षा शाहूराव पवारांची होती. शाहूराव म्हणजे पिळदार मिशा, अगदी नव्वदीच्या दशकापर्यंतही तेवढाच ताठपणा. त्यापूर्वी जी काही विधानसभा निवडणूक झाली, त्यामध्ये शिवाजीराव दादा पंडित आणि बाळराजे पवार यांचे वडील माधवराव पवार हे निवडणुकीमध्ये उभा राहिले. ही १९८५ मधील निवडणूक असावी आणि या निवडणुकीमध्ये केवळ ९० मताने माधवराव पवार यांनी शिवाजीराव पंडितांचा पराभव केला. तेथून पुढे पवार आणि पंडित या दोन कुटुंबामध्ये राजकीय कलह निर्माण झाला. मात्र पुढे माधवराव पवार यांचे राजकीय वर्तुळ पाहता शाहूराव पवार यांनी पंडित कुटुंबीयांसोबत नाते जुळवले ते केवळ सामोपचारासाठी आणि तेथून पुढे या दोन्ही कुटुंबांचे सख्य सुरू झाले. म्हणजे त्यापूर्वी एकमेकांवर काठ्यालाठ्या उचलत होते असे नाही पण त्याचा अध्याय पुन्हा सुरू झाला. बाळराजे पवार यांची सख्खी बहीण पंडित कुटुंबामध्ये असून, जयसिंह पंडित हे त्यांचे नात्याने मेहुणे आहेत. असे नातेगोते झाल्यानंतर हा वाद कमी होईल, अशी चिन्हे होती. तसे पाहिले तर पवार कुटुंब हे गेवराईतील मातंबर आणि पंडित कुटुंब दैठणा मधून स्थलांतरित असेच बोलले जायचे. हा वाद जुना होता पण आताच्या नगरपालिका निवडणुकीमध्ये बाळराजे यांच्या पत्नी गीताभाभी नगराध्यक्ष पदासाठी उभ्या राहिल्या तर त्यांच्या विरोधामध्ये अमरसिंह पंडित यांनी दुसरा उमेदवार उभा केला आणि तिथूनच हा विरोधाचा पुन्हा नवा अध्याय सुरू झाला. मंगळवारी झालेली घटना चूक कोणाची खरे कोण, खोटे कोण यावर पुन्हा बोलले जाईल. परंतु पंडित - पवार यांच्यातील हा वाद नवा नाही केवळ नवा अध्याय सुरू झाला एवढेच म्हणता येईल.

-----------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. ०४ डिसेंबर २०२५


## थोडक्यात



अहिल्यानगर येथे होणाऱ्या कुमार मुली राज्य अजिंक्य खो खो स्पर्धेसाठी बीड जिल्ह्याचा खो-खो संघ इतिहासात पहिल्यांदा रेल्वेने रवाना झाला.यावेळी एमॅच्युअर खो खो असोसिएशन बीडचे अध्यक्ष ऋषिकेश शेळके, सरचिटणीस विजय जाहेर,रमेश भाऊ शिंदे, कैलास गवते, सुवासिनी देशमुख, वर्षा कच्छवा-दिक्कत, सचिव विजय जाहेर, प्रा.जे.पी शेळके, खजिनदार योगेश सोळसे, राजेंद्र बरकसे, बापूसाहेब तारुकर, मनोज जोगदंड, नितीन येळवे,रमेश पिसाळ, बंडू घोरड, प्रफुल हाटवटे, माधव जायगुडे, तुकाराम करांडे, गणेश जायभाये.

## माजलगाव न.प. मध्ये जागतिक दिव्यांग दिन साजरा



माजलगाव । प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नगरपरिषद कार्यालयामध्ये दि ०३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिन म्हणून साजरा करण्यात आला

या जागतिक दिव्यांग दिनाच्या कार्यक्रमांमध्ये प्रामुख्याने नविन नगरपरिषद मुख्याधिकारी बोदंर यांनी दिव्यांग बांधवांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या दिव्यांगाच्चे नेते बच्चु कडू यांनी जवळपास शंभर पेक्षा जास्त शासन निर्णय पारीत केले असून या मध्ये प्रामुख्याने दिव्यांगांचा ५% निधी असेल ते तात्काळ देण्यात येईल व दिव्यांग बांधवांना घरपट्टी व नळपट्टी मध्ये ५०% टक्के सवलत शासन निर्णया नुसार देण्यात येईल असे मुख्याधिकारी बोदंर यांनी संबोधित केले.या कार्यक्रमाचे नियोजन नगर परिषद कर्मचारी भगवान कांबळे,सुधाकर उजगरे,विकी साळवे,आयुब खान पठाण यांनी केले या कार्यक्रमाला प्रहारचे गोपाळ पैजणे,भारत डोंगरे,नितीन कांबळे,विजय जोगडे व दिव्यांग बांधव गणेश शिंदे,आसाराम गिलबिले,नाजेम सय्यद,रशीद तांबोळी,सच्चिदानंद खुर्पे यांच्यासह दिव्यांग बांधव उपस्थित होते.

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुवार रोजी शिवाजी महाराज कोकणे यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी



विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील चौथ्या पुण्यतिथी मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प.रामायणाचार्य शिवाजी महाराज कोकणे चिखली, ज्ञानाई, तुकाई गुरूकुल आष्टी यांचे गुरुवार दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी बेलवाडी यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

# केज,अंबाजोगाई तालुक्यातील सर्वच साखर कारखाने २८०० पहिली उचल देण्यास तयार

### तहसीलदार राकेश गीड्डे ,पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मध्यस्थीने चक्काजाम आंदोलन स्थगित!

केज । प्रतिनिधी

केज ,अंबाजोगाई तालुक्यातील अंबा सहकारी साखर कारखाना, येडेश्वरी ॲग्रो प्रॉडक्ट आनंदगाव (सा.)गंगा माऊली शुगर उमरी, केज या कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना यावर्षी विनाकपात ३०००/- रुपये पहिली उचल देण्याची मागणी करत केज च्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने आज दि.३ डिसेंबर रोजी बेमुदत चक्काजाम आंदोलन पुकारले होते आंदोलनाच्या धास्तीने पोलीस प्रशासन व तहसीलदार,केज यांच्या मध्यस्थीने साखर कारखानदारांचे शेतकी प्रतिनिधी व आंदोलक शेतकरी नेते ,पदाधिकारी यांची आज दि.३डिसेंबर रोजी केज तहसील कार्यालयात



संयुक्त बैठक घेण्यात आली या बैठकीला तहसीलदार राकेश गीड्डे , केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उणवणे, गंगा माऊली शुगरचे शेतकी अधिकारी श्री.अदनाक , अंबा साखर शेतकी अधिकारी श्री. शिंदे येडेश्वरी ॲग्रो प्रॉडक्ट चे श्री.पाटील शेतकरी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष कालिदास आपेट ,क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे , शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती कमिटीचे सदस्य भाई मोहन गुंड व आंदोलक शेतकरी यांची संयुक्त बैठक संपन्न झाली या बैठकीत ऊस दरासंदर्भात अनेक चर्चांच्या फेऱ्या झाल्या शेवटी सर्व साखर कारखान्यांनी यावर्षी गाळप होणाऱ्या ऊसाला पहिली उचल विनाकपात २८००/-रुपये देण्याचे मान्य करत चक्काजाम आंदोलन स्थगित करण्याची विनंती केली.व अंतिम ऊस दर रेव्हेन्यू शेअरिंग फॉर्मुल्यानुसार (ठडऋ)देण्याचे निश्चित केले. यावर सर्व शेतकऱ्यांनी एकमत करून चक्काजाम आंदोलन स्थगित केले आज सायंकाळपर्यंत सर्व कारखान्यांनी लेखी पत्र देण्याचे मान्य केले आहे जर त्यांनी लेखी पत्र दिले नाही तर पुन्हा आंदोलनाचे हत्यार उपसू असा निर्वाणीचा इशारा देखील आंदोलकानी दिला आहे.

## प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध; विभागात एकूण २ लाख ४० हजार ५४९ मतदार

संभाजीनगर । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार, दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर मतदारसंघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केला आहे. सदर सुधारीत कार्यक्रमानुसार मतदारयादीच्या प्रारूप प्रसिध्दीचा दिनांक ०३ डिसेंबर, २०२५ (बुधवार) होता. त्यानुसार प्रारुप मतदार यादी आज प्रसिध्द करण्यात आली.

विभागीय आयुक्त कार्यालयात या कार्यक्रमावेळी विभागीय आयुक्त तथा ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघ मतदार नोंदणी अधिकारी जितेंद्र पापळकर, अपर आयुक्त सामान्य प्रशासन तथा सहायक मतदार नांदणी अधिकारी श्रीमती मंजुषा मिसकर यांच्यासह तसेच राजकीय



पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकूण ४६ हजार ४०६ पुरूष, १५ हजार ९०८ महिला व ४ तृतीयपंथी असे एकूण ६२ हजार ३१८ मतदार आहेत. जालना जिल्ह्यात एकूण २३ हजार ६४८ पुरूष, ५ हजार २७२ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण २८ हजार ९२२ मतदार आहेत. परभणी जिल्ह्यात १६ हजार ६३५ पुरूष, ४ हजार ६४ महिला तर १ तृतीयपंथी असे एकूण २० हजार ७०० मतदार आहेत. हिंगोली जिल्ह्यात ६ हजार ४७६ पुरूष, १ हजार ५२८ महिला असे एकूण ६ हजार ४ मतदार आहेत. नांदेड जिल्ह्यात २३ हजार ८६७ पुरूष, ६ हजार २६४ महिला तर ४ तृतीयपंथी असे एकूण ३० हजार १३५ मतदार आहेत. लातूर जिल्ह्यात १७ हजार ४९२ पुरूष, ४ हजार ९९३ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण २२ हजार ४८७ मतदार आहे. धाराशिव जिल्ह्यात १६ हजार ७६२ पुरूष, ४ हजार ४७ महिला असे एकूण २० हजार ८०९ मतदार आहेत. बीड जिल्ह्यात ३४ हजार ४८५ पुरूष, ९ हजार ६८७ महिला तर २ तृतीयपंथी असे एकूण ४७ हजार १७४ मतदार आहेत. विभागातील आठही जिल्ह्यात एकूण १ लाख ८८ हजार ७७१ पुरूष, ५१ हजार ७६३ महिला तर १५ तृतीयपंथी असे एकूण २ लाख ४० हजार ५४९ मतदार आहेत.

पुढील अत्यंत महत्वाचा टप्पा, म्हणजेच दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी (कलम १२ अन्वये) ( ), हा दिनांक ०३ डिसेंबर २०२५ (बुधवार) ते १८ डिसेंबर २०२५ (गुरुवार) असा निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या सर्व दावे व हरकती दिनांक ०५ जानेवारी, २०२६ पुर्वी निकाली काढण्यात येणार आहेत. अंतिम मतदार यादी प्रसिद्धी दिनांक १२ जानेवारी, २०२६ (सोमवार) असा निश्चित करण्यात आला असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

## पात्र व्यक्तींनी इस्त्राईलला जाण्यासाठी संकेत स्थळावर नोंदणी करावी

बीड । प्रतिनिधी

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत इस्त्राईल देशात " " रोजगाराची संधी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने () राज्यामध्ये जास्तीत जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याची शिफारस केली आहे, जेणेकरून महाराष्ट्र राज्य १ ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे यशस्वी वाटचाल करू शकेल. यामध्ये आतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासह बांधकाम, आरोग्य व इतर क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करण्यावर भर देण्यात आला आहे. यासाठी करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी, एक असलेल्या इस्त्राईल आणि भारत यांच्यातील कराराद्वारे रोजगाराच्या संधी निर्माण करणे, या अंतर्गत इस्त्राईल देशात " " या क्षेत्रात खालीलप्रमाणे नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.

त्या करिता पात्रता निकष पुढील प्रमाणे आहेत.

१. इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे (वाचन, लेखन आणि बोलणे).

२. किमान शैक्षणिक पात्रता १० वी उत्तीर्ण,

३. वय वर्षे २५ ते ५० वयोगटाचे उमेदवार या योजनेमध्ये सहभागी होण्यास पात्र आहेत.४. किमान आवश्यक अनुभव किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक नूतनीकरणाच्या अंतर्गत कामात तज्ज्ञ असणे आवश्यक आहे.

५. नोकरीचे स्थान - इस्त्रायलमध्ये कुठेही.

अधिकाधिक संख्येने इच्छुक पात्र व्यक्तींनी इस्त्राईलला जाण्यासाठी ://. या संकेत स्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन कौशल्य विकास अधिकारी स. आ. किरवले यांनी केले आहे.

## राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ८ ते १४ डिसेंबर कालावधीत नागपूर येथे होणार

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोमवार दि. ८ ते रविवार दि. १४ डिसेंबर २०२५ या कालावधीत नागपूरमध्ये होणार आहे. दि. १३ डिसेंबर शनिवार आणि दि. १४ डिसेंबर रविवार शासकीय सुट्टीच्या दिवशीही दोन्ही सभागृहाचे कामकाज घेण्याचा निर्णय विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

विधानभवन येथे विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.बैठकीला विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षण व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, विधानसभा सदस्य सर्वश्री सुधीर मुनगंटीवार,दीपक केसरकर, जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, सुनील प्रभू,अमीन पटेल विधानपरिषद सदस्य अनिल परब, प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सतेज पाटील, विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळेसंबंधित अधिकारी उपस्थित होते.

'भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल' या ऐतिहासिक पर्वानिमित्त दिनांक २६ मार्च २०२५ रोजी विधानसभेत भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल' या विषयावर सभागृहात चर्चा झाली होती. या वेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या भाषणाचे पुस्तक स्वरूपातील संकलन महाराष्ट्र विधिमंडळ वि.स. पांगे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. हा पुस्तक प्रकाशन सोहळा मंगळवार दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात येणार आहे असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बैठकीत सांगितले.

## मानवी जीवनावर प्रदूषणाचे परिणाम दूरगामी -प्रोफेसर डॉ. अशोक लाखे

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण (२ डिसेंबर) दिनानिमित्ताने राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने प्रोफेसर डॉ. अशोक लाखे यांनी आयोजित व्याख्यानातून राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट्सना संबोधित करताना प्रदूषण व प्रदूषणाच्या विविध प्रकारांची माहिती सविस्तरपणे दिली. प्रदूषण टाळण्यासाठी वृक्षांचे संवर्धन व जतन करणे ही काळाची गरज बनली आहे असे सांगून, पाणी, जमीन, हवा यांचे प्रदूषण निसर्गात वाढत आहे. याचे परिणाम मानवी जीवनावर दुर्गामी होतात. यातून मुक्तता होण्यासाठी प्रत्येकाने निसर्गामध्ये, पाण्यामध्ये घनकचरा



व इतर तत्सम कचरा ठरलेल्या ठिकाणीच टाकावा. अन्यथा प्रदूषणाची पातळी वाढून मानवी आरोग्य धोक्यात येईल असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी प्रदूषणाचे परिणाम मानवी जीवनावर घातक स्वरूपाचे होतात. यातून मुक्तता होण्यासाठी प्रत्येकाने काळजी घेणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मेजर उपप्राचार्य डॉ. मिलिंद गायकवाड यांनी केले. यावेळी कार्यक्रमाकरिता उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी केले.

## पान ६ वरुन...

### हल्ल्या प्रकरणात तपास

बदनामी करणे ही गंभीर बाब असून अशांवर कायदेशीर कारवाई केली पाहिजे. या संपूर्ण प्रकरणात ढाकणे यांनी संयम, जबाबदारी आणि सत्याधारित तपासाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी समाजातील सर्व पक्षांना आवाहन केले की, राजकीय हेतूने असत्य माहिती पसरवणे टाळावे आणि पोलिसांच्या तपासाला सहकार्य करावे.

### राजमाता जिजाऊ

विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शासनाच्या प्रतिनिधींच्या माध्यमातून भारतीय संविधानाविषयी जागृती घडविली. विद्यार्थ्यांनी यामध्ये स्वेच्छेने सहभागी होऊन उपक्रम यशस्वी केला याबद्दल प्राचार्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. मान्यवरांच्या हस्ते शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती होण्यासाठी महाविद्यालयामध्ये बसविण्यात आलेल्या फलकाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. याप्रसंगी विचारमंचावर उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्रसंचालन व आभार प्रा. नागोराव वाघमारे यांनी केले.

### आष्टी वकील संघाच्या अडचणी

श्री शंकर देशमुख यांनी आष्टी येथील न्यायालयात आष्टी वकील संघाच्या कार्यालयात सर्व वकील बंधू भगिनींचा सत्कार केला या प्रसंगी भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड श्री वाल्मिक निकाळजे यांनी आपली भूमिका मांडली आष्टी वकील संघाचे अध्यक्ष ॲड ताहेर साहेब यांनी या सन्मानासाठी शंकर देशमुख यांचे आभार व्यक्त केले व वकीलांच्या अडीअडचणी मांडल्या. यावेळी आष्टी वकिल संघाचे अध्यक्ष ॲड ताहेर साहेब प्रदेश अनुसुचित मोर्चाचे उपाध्यक्ष ॲड वाल्मिक तात्या निकाळजे,ॲड बाबुराव अनारसे ॲड अजय जोशी ॲड तांदळे ॲड सायंबर ॲड झांबरे ॲड म्हस्के ॲड निकाळजे वैद्यनाथ ॲड शार्दुल जोशी ॲड सय्यद बँक सल्लागार राजेंद्र शिंदे रघुनाथ शिंदे महेश पवळ नितिन गायकवाड अशोक खंदारे संदीप नागरगोजे आदी वकील व कार्यकर्ते

### उसाचा दर जाहीर

सुभाषराव नांदे, अमोल दुबाले व बंडु मात्रे, पाटेगाव येथील शेतकरी गोविंद कदम, वचिष्ट वाघ, विजयराजे कदम व सोमनाथ कदम पिंपळादेवी येथील शेतकरी प्रदीपराव घुमरे, शुरेश दादा घुमरे, बालाप्रसाद आवारे, विशाल घुमरे, रंजेगाव येथील शेतकरी विलासराव आबुज, मुकुंद आबुज, युवराज आबुज, दिलीप आबुज आणि धनंजय आबुज , आहेर चिंचोली राकटे या सर्व शेतकरी बांधवांची मोलाची साथ मिळाल्याने आंदोलन यशस्वी झाले आहे.

# बेलगावच्या रेणुकाई देवीचा यात्रोत्सव : शुक्रवारी कुस्त्यांचा हंगामा

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील श्री रेणुकाई देवी यात्रा उत्सवान दत्तजयंतीपासून प्रारंभ होत आहे. हा उत्सव तीन चालतो वा यात्रा उत्सवात गुरुवार दि.४ डिसेंबर रोजी संध्याकाळी रेणुक्कई देवीची पालखी पि रवणूक (छबीना) मोठ्या उत्साहात संपन होणार आहे. शुक्रवार दि.५ डिसेंबर रोजी कुस्त्यांचा हग़ामा होणार आहे. बेलगांव ग्रामस्य दरवर्षी रेणुकाई यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्कम या भव्य कुस्ती हंगामाला हजेरी लावतात.

ग्रामस्थांकडून देवीच्या परिसरात निसर्गरम्य बातावरणात दावों ही यात्रा भरवली जाते. यात्रेनिमित भाविकभक्तांनी रेणुकादेवीच्या दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन सरपंच, उपसरपंच, ट्रस्ट अध्यक्ष, ग्रामपंचायत सदस्न, बेलगाव ग्रामस्थ व रेनुकाई देवी मंदिर ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. गुरुवार दि.४ डिसेंबर रोजी संध्याकाळी कोमल पाटोळे यांचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार दि. ५ डिसेंबर रोजी कुस्त्यांचा जंगी हंगामा होणार आहे. महाराष्ट्रातल्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक जागृत पीठ म्हणजे माहूरची नी ९ दिवस विविध धार्मिक अध्यात्मिक कार्यक्रम घेऊन जागर घालून शारदीय नवरात्र महोत्सव दिवसभर विविध कार्यक्रम रात्री हरीकिर्तन असे व कार्यक्रम असतात, शेवटच्या दिवशी नराजोत्सवाची महाप्रयाने सांगता होते. मार्गशीर्ष महिन्यातील मेला जयंतीच्या दिवशी रेणुकाई बातेची यावा वेलगांव ग्रामस्थ मोठया उत्साहात साजरा करतात. तीन दिवस हा यात्रा महोत्सव चालतो. पहिल्या दिवशी विधीवत पौर्णिनिदिवशी देवीची पालखी प्रक्षित मिणूक मिलाक परिसरातील अहेगायपुक्यात प्रसिध्द आहे. तिसन्या दिवशी हैच चाचा गावात भरले.रेणुकामाता, माहूर हे प्राचीन

### प्रख्यात मल्ल येणार तर ४ तारखेला संध्याकाळी कोमल पाटोळे यांचा देवीच्या गिताचा कार्यक्रम

किल्याचे ठिकाण, रेणुकाम ता, दत्तात्रेय, अनुभमामाता या तीन डोंगरावरील मंदिरांना सामावणारा हा माहूरचा डोंगर किल्ला. तिथेच उपपीठ म्हणून बेलगावच्या रेणुकाई देवीचे ओळख आहे. दरवर्षी पावी माहूरला जाणाऱ्या आपल्या मक्ताच्या पाठीमागे शेळीच्या स्यात माहरची रेनुकामाता येऊन बेलगांव वा गाधी प्रकट झाली अशी जुनी आख्यायिका आहे. बेलगाव व परिसरातील भाविकांची ही कुलदेवता आहे. बेलगांवचे ग्रामस्थ मोठ्या नद्धाभावाने रेयुकाई मातेची मनोभावे सेवा करतात. रेयुकाई देवीला यात्रा व नवरात्रोत्सवाला विशेष साज, श्रृंगार चढवला जातो. सोन्याचे दागिणे आणि अलंकार देवीला पदाविले

जातात, दागीण्यांनी सजलेल्या रेनुका देवीचं नथन म नोहरी रूप प्रत्यक्ष डोळ्याने पाहण्यासारखे असते.

आशी शहरापासून १० कि. मी. अंतरावर बेलगाय हे गाव बसलेले आहे. त्या गावचे जागृत देवस्थान माहूरगडचे उपस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रेयुकाईमातेचे पुरातन काळातील दगडी कोरीव केलेले मंदिर असून हे मंदिर बोकडी नदीच्या काठावर टेकडीक्षा असून नयनरम्य बातावरणात देवीचे मंदिर आहे. हा परिसर भाविक व पर्यटकांना आकर्षित करणारा आहे. बेलगाव आणि परिसरात रेगुकामातादेवीचे महात्म आहे. संपूर्ण पंचक्रोशीत ही देवी नवसाला पावते म्हणून तिची ख्याती आहे. मोठ्या भक्तिभावाने बेलगांव ग्रामस्थ नवरात्र

उत्सवात विधिवत पुजाअर्चा करून घटस्थापना करून ९ दिवस देवीचा जागर करतात, निसर्गरम्य वातावरणात असलेले देवीचे मंदिर हे राज्यातील कानाकोप-यातुन च आशी तालुक्यातील भाविकांसाठी एक तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते. रेणुकामातेचे महात्म्य पूर्ण राज्यात प्रसिद्ध आहे. दरवर्षी बेलगाव येथील तरुण श्री क्षेत्र माहूरगड ते बेलगाव ५०० कि. मी. चे अंतर पायी चालत देवीची ज्योत घेऊन येतात. ही ज्योत माहूरगड ते बेलगाव पायी चालत घेऊन येतात. ही परंपरा कायम आहे. यामध्ये २०० तरुण सहभागी होतात. बेलगाव ग्रामस्थ नवरात्रात ९ दिवस मोठ्या भावाने नवरात्र महोत्सव साजरा कातात. यात्रेच्या दरम्यान देवीचा परिसर भाविक भक्तांच्या गर्दनि गजबजून केलेला असतो. श्री रेणुकाई देवी देवस्थान ट्रस्टला महाराष्ट्र शासनाचा दर्जा प्राम झाला आहे. भक्तनिवास, मंदिर परिसर सुशोभीकरण आदी विविध विकास कामे या ट्रस्टच्या माध्यमातून मंदिर परिसरात सुरु आहेत.




# शेतकरी कर्जमाफी करणार पण ; फडणवीसांनी सांगितला सरकारचा प्लॅन

पुणे । प्रतिनिधी

राज्यात शेतकरी कर्जमाफीचा विषय चर्चेत आहे. खरं तर महायुती सरकारने सत्तेत येण्यापूर्वीच आम्ही शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करू, शेतकऱ्याचा सातबारा कोरा करू अशी घोषणा केली होती. परंतु सत्तेत आल्यानंतर जवळपास वर्ष झालं तरी अजूनही शेतकऱ्याचा सातबारा कोरा झालेला नाही. बच्चू कडू यांच्या आंदोलनानंतर सरकारने ३० जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करू हे जाहीर केलं. मात्र त्यासाठी एका समितीची स्थापना केल्याने कोणत्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार आणि कोणाला वगळण्यात येणार यावरून शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आहे. आता खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच कर्जमाफीबद्दल मोठं विधान केलं आहे. शेतकरी कर्जमाफी आम्ही निश्चित



करणार आहोत परंतु कर्जमाफी नेमकी कोणत्या तारखेला करण्यात येणार, याबद्दल अजूनही त्यांनी ठामपणे सांगितलं नाही.

एका मुलाखतीत बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले, होय, आम्ही कर्जमाफी निश्चितपणे करणार आहोत. त्या संदर्भातली आमची कमिटी आता काम करते आहे. सगळ्या कर्जमाफीमधे फायनली आमच्या लक्षात येतं की शेतकऱ्याला किती फायदा झाला माहिती नाही पण बँकांना फायदा जास्त होतो. त्यामुळे शेतकऱ्याला फायदा कसा देता येईल, त्याला त्या दुष्टचक्रातून काही काळ तरी बाहेर कसं काढता येईल याचा आपल्याला विचार करावा लागेल. म्हणून आपल्याला कशा पद्धतीने कर्जमाफी करायची याच्या संदर्भातली कमिटी काम करते आहे. देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, आपण बघा २०१७ ला आपण कर्जमाफी केली. २०२० ला केली, इतक्या फास्ट कर्जमाफी २- ३ वेळा करायची वेळ येणं याचाच अर्थ कुठेतरी सिस्टमच चूकत आहे. तर त्या सिस्टमला योग्य पद्धतीनं कसं वापरता येईल हा आमचा प्रयत्न आहे आणि ज्यांना आवश्यक आहे त्याच शेतकऱ्यांना कर्जमाफी झाली पाहिजे अशा पद्धतीनं त्याचं स्ट्रक्चरिंग आम्हाला करायचं आहे. दरम्यान, मागील आठवड्यातच शेतकऱ्यांकडून करण्यात येणाऱ्या कर्जाच्या वसुलीला एक वर्षे स्थगिती दिली. पूर परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे. याबरोबरच सहकारी कर्जाचे पुनर्गठन करण्याचे आदेशही राज्य सरकारने दिले आहेत. सरकारच्या या निर्णयामुळे लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. कारण अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांकडून काही ठिकाणी बँकांनी कर्ज वसुलीसाठी तगादा लावल्याच्या तक्रारी येत होत्या.

## ढगाळ वातावरणामुळे रब्बी पिकांना फटका



पुणे । प्रतिनिधी

राज्यात पावसाळी व ढगाळ वातावरण तब्बल १२ दिवस नोव्हेंबर अखेरीस होते. गेल्या दीड महिन्यात फक्त १५ ते २० दिवस निरभ्र, कोरडे वातावरण रागिले. यामुळे रब्बी पिकांचे नुकसान होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या महिन्यातही ढगाळ वातावरण आहे. दुपारी उकाडा असतो. सायंकाळनंतर गारठा असतो.

नोव्हेंबरच्या मध्यात निरभ्र वातावरण होते. नंतर ढगाळ वातावरण होते. इतर दिवस ढगाळ, अंशतः ढगाळ वातावरण राहिले आहे. स्वच्छ सूर्यप्रकाशाची गरज रब्बीला आहे. यातच सोमवारी गारठा वाढला. मध्यंतरी थंडी कमी होती. पण मागील दोन दिवस थंडी आहे. पण रब्बीच्या जोमदारवाढीसाठी निरभ्र, कोरड्या वातावरणाची पिकांना गरज आहे. नोव्हेंबरमध्ये खानदेशात अनेक भागांत ढगाळ वातावरण होते. यानंतर ढगाळ व पावसाळी वातावरण अनेक दिवस कायम होते. चांगली किंवा हुडहुडी भरविणारी थंडी काही दिवस होती. नोव्हेंबरच्या सुरवातीला जळगावमध्ये चोपडा, धरणगाव, जळगाव, एरंडोल, पाचोरा आदी भागांत मध्यम पाऊस झाला. पावसानंतर थंडीचे आगमन झाले आहे. किमान तापमान सात अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले होते. पण मध्यंतरी ढगाळ वातावरणामुळे कापसाची खेडा खरेदीदेखील थांबली होती. कारण ही खरेदी उघड्यावर केली जाते. कापूस ट्रकमध्ये भरून वाहतूक केली जाते. यासाठी कोरडे वातावरण हवे असते. कांदा रोपांचे अंशतः नुकसान ढगाळ वातावरणात झाले आहे. अनेक शेतकऱ्यांची केळी, पपई काढणीवर आहे. रब्बी पिकांची पेरणी कशीबशी शेतकऱ्यांनी उरकली. पण ही पिके विषम वातावरणामुळेसंकटात आहेत. कांदा रोपवाटिकांची हानी होत आहे. यामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. ढगाळ वातावरणात बुरशीजन्यरोग सक्रिय होवून पुढे भाजीपाला, केळी पिकात नुकसान झाले आहे, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

## तुकडाबंदी रद्द ; आता नियमितीकरणाच्या प्रक्रियेला प्रारंभ

पुणे : तुकडा बंदी कायदा रद्द केल्यानंतर नियमबाह्य पद्धतीने झालेले व्यवहार अधिकृत करण्यासाठीची कार्यपद्धती राज्य सरकारने निश्चित करून दिली आहे. या कार्यपद्धतीची अंमलबजावणी मंगळवारपासून (दि. २) सुरू झाली आहे. त्यानुसार आता महापालिका क्षेत्रातील असे सर्वच व्यवहार आतापर्यंत अनोंदणीकृत दस्ताने झालेले असल्यास त्यांना पुन्हा नोंदणीकृत दस्त करून ते नियमित करता येणार आहे.




ग्रामीण भागातील शेती क्षेत्रात झालेल्या तुकड्यांच्या व्यवहारांना मान्यता देण्यात आलेली नाही. रहिवासी, औद्योगिक आणि व्यावसायिक विभागांतील तुकड्यांना मात्र, नियमित करता येणार आहे. यासाठी खरेदी विक्री करणाऱ्यांना प्रतिज्ञापत्र द्यावे लागणार आहे. महापालिका हद्दीतील १५ नोव्हेंबर २०२४ पूर्वी अशा व्यवहारांना राज्य सरकारने नियमित करण्याचे ठरविले आहे. यामुळे लाखो नागिरकांना मोठा दिलासा मिळाला आहे. महापालिका हद्दीतील सर्व विभागांमधील तुकड्यांना याचा निर्णयाचा लाभ होणार आहे. असे व्यवहार नोंदणीकृत दस्ताने झालेले असल्यास मात्र, त्याची सातबारा उतारा किंवा मालमत्ता पत्रकावर नोंद नसल्याने ती करून घेण्याचे निर्देश महसूल विभागाला देण्यात आले आहे. महापालिका वगळता ग्रामीण भागातील अशा व्यवहारांत शेती क्षेत्र असल्यास तुकड्यांची नोंद नियमित होणार नाही. रहिवासी, औद्योगिक तसेच व्यावसायिक विभागातील तुकड्यांची नोंद करता येणार आहे. या नोंदीनंतर असे तुकडे दुसऱ्यालाही विकता येणार आहेत. तसेच यापूर्वी खरेदी केलेल्या तुकड्यातील काही भाग अनोंदणीकृत दस्ताने १५ नोव्हेंबर २०२४ पूर्वी विकलेला असल्यास त्याची नोंदही केली जाणार आहे. त्यासाठी नियमानुसार रेडीरेकनर मधील जमिनी दराच्या सात टक्के मुद्रांक शुल्क भरावे लागणार आहे. अशा व्यवहारांची दस्तनोंदणी पूर्वी झाली असेल, तर त्यांची फेरफार आणि सातबारा उताऱ्यावर नोंदणी निशुल्क होणार आहे.

## शाश्वत पीक उत्पादनासाठी मृद व जलसंधारण

राज्यातील एकूण लागवडी योग्य जमिनी पैकी ८० टक्के शेती ही पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर म्हणजेच निसर्गावर अवलंबून आहे. कोरडवाहू क्षेत्रातील रब्बी हंगामाच्या दृष्टीने जमिनीतील ओलाव्याचे नियोजन अर्थात मृद व जलसंधारण कसे करावे? याबाबत कोरडवाहू शेतीच्या उत्पादन वाढीच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. कोरडवाहू शेतीत 'ओल तसे मोल' या उक्तीस पीक उत्पादन वाढीच्या दृष्टीने अनन्य साधारण महत्व आहे. जमिनीतील ओलावा हा पडणाऱ्या पावसावर आणि जमिनीच्या खोलीवर अवलंबून असतो. एकूण पडणाऱ्या पावसापैकी १० ते २० टक्के पाणी जमिनीवरून वाहून जाते. १० टक्के पाणी निचऱ्याद्वारे आणि ६० ते ७० टक्के पाणी बाष्पीभवनाद्वारे निघून जाते. वाहून जाणारे, निचऱ्या द्वारे आणि बाष्पीभवनाद्वारे वाया जाणारे पाणी जमिनीत जास्तीत जास्त प्रमाणात कसे साठविता येईल आणि त्या ओलाव्याचा उपयोग कोरडवाहू शेतीच्या पीक उत्पादन वाढीच्या दृष्टीने करण अतिशय महत्वाचे आहे. त्यासाठी पावसाच्या पाण्याचे नियोजन हे अतिशय महत्वाच आहे.

पावसाच्या पाण्याचे नियोजन : अवर्षण प्रवण क्षेत्रातील पावसाचा अभ्यास केला तर अस दिसून येते कि या भागात पावसाचे प्रमाण अत्यंत कमी,(सरासरी ५०० ते ७५० मि.मी. पेक्षा कमी) पाऊस हा अनिश्चित, लहरी, बेभरवशाचा आणि प्रतिकूल असतो. सर्व साधारणपणे जून-जुलै मध्ये पाऊस सुरु होतो.जुलै-ऑगस्ट मध्ये पावसाचे प्रमाण घटते आणि त्याचबरोबर तो अनिश्चित असतो.

सप्टेंबर महिन्यात म्हणजे उत्तरा व हस्त नक्षत्रा मध्ये सर्वात जास्त म्हणजे १५० ते २०० मि.मी.पाऊस पडतो. चित्रा नक्षत्रात म्हणजेच ऑक्टोबरच्या मध्यानंतर पाऊस पूर्णपणे थांबतो म्हणून या भागातील ७० टक्के क्षेत्र रब्बी पिकाखाली असते आणि त्यापैकी ८० टक्के क्षेत्रावर शेतकरी रब्बी ज्वारीची पेरणी करतात. त्यामुळे रब्बी हंगामातील पिकांसाठी ओलावा साठविण्याच्या दृष्टीने खरीप हंगामातील ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब न थेंब जमिनीत, जिरवणे, मुरविणे आणि साठविणे अत्यावश्यक आहे. या जमिनीत मुरलेल्या पावसावरच रब्बी पिकांचे उत्पादन अवलंबून आहे.त्यासाठी खरीप



हंगामात पडलेल्या पाऊस जमिनीत कसा मुरविता येईल हे शेतकऱ्यांनी पाहिलं पाहिजे.

सपाट वाफे : कोरडवाहू शेतीमध्ये जेथे पाणी मुरण्याचा वेग जास्त आहे आणि जमिनीला फारसा उतार नाही अशा ठिकाणी उतारला आडवे वाफे तयार करावेत.वाफे तयार करतांना प्रथम कुळवाची पाळी द्यावी. त्यानंतर बळीराम नांगराने उभे - आडवे ६ मीटर ६ मीटर अंतरावर उतारास आडवे सपाट वाफे तयार करावेत. वरंब्याची उंची साधारणपणे २० ते ३० से.मी. ठेवावी. असे वाफे जागोजागी पाणी मुरविण्यास मदत करतात. त्यामुळे जमिनीमध्ये नेहमीपेक्षा ५० टक्के जास्त ओल साठवली जाते. या पद्धतीमुळे रब्बी ज्वारीचे हेक्टरी उत्पादन २ ते ३ क्विंटल पर्यंत वाढल्याचे आढळून आले आहे.

सरी वरंबे : मध्यम ते भारी जमिनीत खरीप हंगामात बळीराम नांगराने उतारास आडवे तास घालावेत. त्यामुळे सऱ्या तयार होतात आणि पडणाऱ्या पावसाचे पाणी सऱ्या मधून जमिनीत मुरते. या पद्धतीत ८० टक्क्यापर्यंत पाणी जमिनीत मुरते. जमिनीतून पाणी वाहून जात नाही.सऱ्यांची लांबी ९० मीटर पर्यंत ठेवावी.या पद्धतीमुळे उत्पादनात ३५-४० टक्के वाढ दिसून आली आहे.

बंदिस्त सरी वरंबे : या पद्धतीत मुख्य वरंबे उतारास आडवे ठेवावेत तर बंदिस्त वरंबे उताराच्या दिशेने ठेवावेत.अशा रीतीने उताराला आडवे बंदिस्त सरी वरंबे तयार होतात.मुख्य वरंब्याची लांबी ६ मीटर व उंची ३० से.मी.ठेवावी. तर बंदिस्त वरंब्याची उंची २० से.मी. व दोन वरंब्यातील अंतर ३ मीटर ठेवावे. या पद्धतीत जास्त पाऊस पडला तरी बंदिस्त वरंबे फुटून संथ गतीने पाणी शेतातून बाहेर जाते. ही पद्धत कोरडवाहू भागात चोपण व क्षारयुक्त जमिनीत पाणी मुरविण्यासाठी उपयुक्त असून त्यामुळे जमिनीतील विद्राव्य क्षारांचे प्रमाण कमी होण्यास मदत होते.

जैविक बांध : समपातळीत उतारास आडवे मातीचे बांध टाकण्याऐवजी वनस्पतींची अंजन, खस गवत आणि सुबाभूळ अशा वनस्पतींची निवड करावी. गवतांचे ठोंब किंवा बी समपातळीत उताराला आडवे दोन ओळीत पावसाळ्याच्या सुरुवातीस लावावे. दोन ओळीत ३० से.मी. अंतर ठेवावे.दोन रोपातील अंतर १५ ते २० से.मी. ठेवावे.जैविक बांधामुळे वाहून जाणाऱ्या पाण्यास अडथळा निर्माण होऊन पाण्याचा वेग कमी केला जातो. जमिनीची धूप कमी होते.गवती बांधामुळे जनावरांना चारा मिळतो.सुबाभूळीच्या जैविक बांधाची उंची ३० से.मी ठेवून कापलेल्या कोवळ्या फांद्याचा जनावरांना वैरण म्हणून किंवा जमिनीत गाड्ल्यास हिरवळीचे खत म्हणून उपयोग होतो.दोन जैविक बांधामुळे ह्या कोवळ्या फांद्या कापून टाकल्यास त्याचा धूप प्रतिबंधक म्हणून उपयोग होतो व सेंद्रिय कर्बाचे प्रमाणही वाढते.त्याद्वारे रब्बी पिकांमध्ये प्रती हेक्टरी २५ ते ५० किलो नत्राची बचत करता येते. जैविक बांधामुळे उत्पादनात २० ते २५ टक्के वाढ झाल्याचे आढळून आले आहे.

समपातळीत लागवड व मशागत : जमिनीचे सपाटीकरण, नांगरणी, कुळवणी, कोळपणी यासारख्या मशागती व पेरणी समपातळीत पण उताराच्या आडव्या दिशेने कराव्यात. त्यामुळे पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण होतो.पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते.वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाचा वेग कमी केला जातो आणि धुपीस आळा बसतो. कोळपणी व खुरपणीमुळे जमिन भुसभुशीत होते. भेगा कमी प्रमाणात पडतात. त्यामुळे जमिनीतील भेगांमधून बाष्पीभवनाद्वारे होणाऱ्या पाण्याचा ऱ्हास कमी होतो. जमिनीत ओलावा जास्त काळ व जास्त प्रमाणात साठविला जातो. मशागतीमुळे तणांचा नाश होऊन ताणांमुळे कमी होणारा ओलावा वाचून दीर्घकाळ पिकास उपयोगी पडतो.

रब्बी ज्वारीसाठी मूलस्थानी जलसंधारण : रब्बी हंगामातील ज्वारीसाठी पाण्याचा पुरवठा करण्याच्या दृष्टीने खरीप हंगामातील ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात पडणाऱ्या पावसाचा थेंब न थेंब जमिनीत मुरविणे अतिशय महत्वाचे आहे. त्यसाठी उन्हाळ्यात शेती मशागतीची कामे उतारास आडवी करावीत. नांगरट झाल्यानंतर हेक्टरी १० ते १२ गाड्या शेणखत जमिनीत मिसळून द्यावे.त्यानंतर कुळवाच्या पाळ्या देऊन शेतातील काडी कचरा ,धसकटे वेचून शेत साफ करावे. पावसाचे पाणी साठवून ठेवण्यासाठी जमिनीच्या उतारावर वाफे तयार करावेत.(३.६० ३.६० चौ. मी. आकाराचे) वाफे तयार करताना सारा यंत्राने सारे करून त्यामध्ये बळीराम नांगराने दंड टाकल्यास कमी खर्चात वाफे तयार होतात. सदर वाफे रब्बी ज्वारीच्या पेरणीपूर्वी ४५ दिवस अगोदर करावेत म्हणजे १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर हा काळ रब्बी ज्वारीच्या कोरडवाहू क्षेत्रामध्ये पेरणी करण्यासाठी शिफारस केलेला आहे. तेव्हा १५ सप्टेंबर पूर्वी ४५ दिवस म्हणजे ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वाफे तयार करावेत. पेरणीपूर्वी जेवढा पाऊस पडेल तेवढा त्यामध्ये जिरवावा. पेरणीच्या वेळी वाफे मोडून पेरणी करावी व पुन्हा सारा यंत्राच्या सहाय्याने गहू, हरभरा पिकासारखे सारे पडून आडवे दंड पाडावेत म्हणजे पेरणीनंतर पाऊस पडल्यानंतर तो आडवून जिरवता येईल या तंत्राने रब्बी ज्वारीचे ३०ते ३५ % उत्पादन वाढते.




### जागतिक दिवस: भारतीय नौसेना दिन

### महत्वाच्या घटना

१७७१ : दऑब्जर्व्हर हे जगातील पहिले रविवार वृत्तपत्र प्रकाशित झाले.
१८२९ : भारतीयांचा कट्टर विरोध असूनही लॉर्ड बेंटिंगने जाहीरनामा काढून सतीच्या प्रथेला मदत करणाऱ्यांना खुनी ठरवले जाईल असा कायदा केला. तसेच सतीप्रथा बंद केली.
१८८१ : लॉस ऍन्जेलिस टाइम्स वृत्तपत्राचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१८८८ : भारताचे प्रसिद्ध इतिहासकार रमेश चंद्र मजूमदार यांचा जन्म.
१९२४ : मुंबईतील 'गेटवे ऑफ इंडिया'चे उद्घाटन झाले.
१९४८ : भारतीय लष्कराचे सरसेनापती म्हणून जनरल करिअप्पा यांची नेमणूक झाली. त्यांनी १५ जानेवारी १९४९ रोजी ब्रिटिशांकडुन भारतीय सेनेची सूत्रे हाती घेतली.
१९५९ : ला भारत आणि नेपाल मध्ये गंडक सिंचन व विद्युत प्रकल्पांवर सह्या झाल्या.
१९६७ : थुंबा येथील तळावरुन 'रोहिणी' या पहिल्या भारतीय अग्निबाणाचे यशस्वी उड्डाण
१९७१ : भारतीय नौदलाने कराचीतील पाकिस्तानी नौदलावर हल्ला केला.
१९७१ : ला भारत आणि पाकिस्तान बिघडत्या संबंधांना पाहून संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने आपत्काल मध्ये बैठक बोलावली होती.
१९७५ : सुरीनामचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९९१ : पॅन ॲम या अमेरिकन विमानकंपनीने दिवाळखोरी जाहीर केली.
१९९३ : उस्ताद झिया फरिदुद्दीन डागर आणि पंडित एस. सी. आर. भट यांना मध्यप्रदेश सरकारचा 'तानसेन सन्मान' जाहीर
१९९६ : ला अमेरिकेच्या नासाने मार्स पाथफ़ाउंडर नावाचे अवकाशयानमंगळावरपाठवले होते.
१९९७ : संगीत दिग्दर्शक कल्याणजी-आनंदजी यांना मध्यप्रदेश सरकारचा 'लता मंगेशकर पुरस्कार' प्रदान
२००३ : अशोक गहलोत १२ व्या विधानसभेसाठी निवडल्या गेले होते.
२००४ : मारिया ज्युलिया मॅन्टीला हिने मिस वर्ल्ड चा पुरस्कार जिंकला होता.
२००८ : मध्ये लोकप्रिय रोमिला थापर यांना क्लूज पुरस्कारासाठी निवडल्या गेले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३५ : सॅम्युअल बटलर इंग्लिश लेखक (मृत्यू: १८ जून १९०२)
१८५२ : रशियन भौतिकशास्त्रज्ञ ओरेस्ट ख्वोल्सन यांचा जन्म.
१८६१ : आइसलँड देशाचे पहिले पंतप्रधान हंगेस हफस्टाइन यांचा जन्म. (मृत्यू: १३ डिसेंबर १९२२)
१८९२ : स्पेनचा हुकुमशहा फ्रान्सिस्को फ्रँको यांचा जन्म.
१८९८ : मध्ये भौतिकशास्त्राचे शास्त्रज्ञ श्रीनिवास कृष्णन यांचा जन्म.
१९१० : आर. वेंकटरमण भारताचे ८ वे राष्ट्रपती, केन्द्रीय मंत्री, कायदेपंडित, स्वातंत्र्यसेनानी (मृत्यू: २७ जानेवारी २००९)
१९१० : मोतीलाल राजवंश ऊर्फ 'मोतीलाल' आपल्या ऐटबाज व्यक्तिमत्त्वाने व सहजसुंदर अभिनयाने रसिकांवर मोहिनी घालणारे अभिनेते (मृत्यू: १७ जून १९६५)
१९१० : मध्ये भारतीय क्रिकेटर अमर सिंग यांचा जन्म.
१९१६ : बळवंत गार्गी पंजाबी नाटककार, दिग्दर्शक, कादंबरीकार व लघुकथाकार, पंजाब विद्यापीठातील भारतीय रंगभूमी विभागाचे प्रमुख, 'थिएटर ऑफ इंडिया' आणि 'फोक थिएटर ऑफ इंडिया' या पुस्तकांचे लेखक (मृत्यू: २२ एप्रिल २००३ मुंबई)
१९१९ : इंदर कुमार गुजराल - भारताचे १२ वे पंतप्रधान (मृत्यू: ३० नोव्हेंबर २०१२)
१९३२ : दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष रोह तै-वू यांचा जन्म.
१९३५ : शंकर काशिनाथ बोडस पंडित विष्णू दिगंबर पलुसकर यांच्या परंपरेतील गायक (मृत्यू: २० जुलै १९९५)
१९४३ : मराठी लेखक कॅथोलिक ख्रिस्ती फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांचा जन्म.
१९६२ : मध्ये लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांचा जन्म.
१९६३ : मध्ये भारतीय चित्रपट सृष्टीचे कलाकार जावेद जाफरी यांचा जन्म.
१९७७ : भारतीय क्रिकेटर अजित आगरकर यांचा जन्म.
१९७९ : देशाच्या धावपटू सुनीता रानी यांचा जन्म

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५० : विद्युत मोटरचे शोधक विल्यम स्टर्जन यांचे निधन. (जन्म: २२ मे १७८३)
१९०२ : डो जोन्स एंड कंपनी चे सहसंस्थापक चार्ल्स डो यांचे निधन. (जन्म: ६ नोव्हेंबर १८५१)
११३१ : ओमर खय्याम - पर्शियन तत्त्वज्ञ, गणितज्ञ, खगोलशास्त्रज्ञ आणि कवी (जन्म: १८ मे १०४८)
१९६२ : हास्य कवी अन्नपूर्णानंद यांचे निधन.
१९७३ : कवी गिरीश तथा शंकर केशव कानेटकर यांचे निधन. (जन्म: २८ ऑक्टोबर १८९३)
१९७५ : जर्मन तत्त्वज्ञ आणि लेखक हाना आरेंट यांचे निधन.
१९८१ : मराठी चित्रकार ज. ड. गोंधळेकर यांचे निधन.
२००० : सुरिनाम प्रजासत्ताकचे पहिले पंतप्रधान हेन्क अर्रोन यांचे निधन. (जन्म: २५ एप्रिल १९३६)
२०१४ : भारतीय वकील आणि न्यायाधीश व्ही. आर. कृष्ण अय्यर यांचे निधन. (जन्म: १५ नोव्हेंबर १९१५)
२०१७ : भारतीय चित्रपट सृष्टीचे प्रसिद्ध कलाकार शशी कपूर यांचे निधन.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
गुरूवार दि.४ डिसेंबर २०२५
५

# दिव्यांगांसाठी मदत केंद्र कार्यान्वित करणार-जिल्हाधिकारी मित्तल

## मनपातर्फे ३९५ दिव्यांगांची आरोग्य तपासणी

जालना। प्रतिनिधी

शारीरिक दृष्ट्या कमजोर असले तरी सक्षम असलेल्या दिव्यांगांना मदत करण्यास प्रशासन सदैव तत्पर असून दिव्यांगांनी मनाने सक्षम व्हावे त्यांच्या मदतीसाठी स्वतंत्रपणे दिव्यांग मदत केंद्र आगामी काळात कार्यान्वित करणार असल्याची घोषणा जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी आज केली. आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त बुधवारी ( ता ०३) लायन्स क्लब ऑफ आणि जालना शहर महानगरपालिकेच्या वतीने मनपा कार्यालयात दिव्यांगांसाठी आयोजित मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिर शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी मित्तल बोलत होत्या.

यावेळी उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे ,समाज कल्याण अधिकारी स्नेहल मुधाळे ,अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम ,लायन्स क्लब ऑफचे राधेश्याम टिबडेवाल ,सचिव राजेश खिस्ते, रतन बजाज,डॉ. गिरीश पाकणीकर,अरुण मित्तल, डॉ.संगीता राजे -देशमुख,द्वारकादास मुंदडा , प्रकाश सिगेदार,उपायुक्त नंदा गायकवाड,सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे,अनुराधा नागोरी,अपर्णा जाधव,आलेक जेकब,




### ३९५ जणांना लाभ....!

दिवसभर चाललेल्या मोफत नेत्र व आरोग्य तपासणी शिबीरात ८९ दिव्यांगांची नेत्र तपासणी करण्यात आली.कॅट्रॅक्ट ऑपरेशन चे रुग्ण ६ आढळून आले.आरोग्य तपासणी (७०),रक्त तपासणी(२२), करण्यात आली.१३३ जणांना क्षयरोगबाबत मार्गदर्शन करून ८१ जणांचे आयुष्मान कार्ड काढण्यात आले.एकूण ३९५ दिव्यांग बांधवांनी शिबीराचा लाभ घेतला.

सकल दिव्यांग संघटनेचे राहुल मुळे, बळीराम बेंद्रे, पी.के .खरात, विठ्ठलराव दराडे , बोरूडे यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी मित्तल म्हणाल्या, दिव्यांगांच्या भावना प्रशासनापर्यंत पोहोचण्याकरिता जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात सेंटरची उभारणी केली जाणार असून दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी जिल्हा नियोजन विकास समिती, महानगरपालिका यांच्या माध्यमातून विशेष निधी राखीव ठेवण्यात आला आहे. यातून नियमात बसणारे विकासात्मक कार्य केले जातील असे नमूद करत तालुका स्तरावर गट संसाधन केंद्रासाठीही निधीची तरतूद केली असल्याचे जिल्हाधिकारी मित्तल यांनी सांगितले.शिक्षण आणि रोजगार यावर दिव्यांगांनी लक्ष केंद्रित करावे असे आवाहन जिल्हाधिकारी मित्तल यांनी केले. उपायुक्त नंदा गायकवाड यांनी कामानिमित्त मनपा कार्यालयात येणाऱ्या दिव्यांगांसाठी विल चेअर उपलब्ध करून दिली असून खालच्या मजल्यावरच कार्यालय स्थलांतरित केली जाईल असे गायकवाड यांनी सांगितले. शासन, स्वयंसेवी संस्था यांनी दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करावे असे त्यांनी नमूद केले. यावेळी दिव्यांगांचा सत्कार करण्यात आला . तसेच मनपाचे कर्मचारी दिव्यांग बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# नगरमध्ये तीन मजली इमारतीला भीषण आग; कस घडलं, मोठे नुकसान

## २० पेक्षा अधिक बंबांनी विझवली आग; ए.एस. मार्केटिंगचे गोदाम जळून खाक



अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर शहराच्या मध्यवर्ती परिसरातील बुरुड गल्ली या ठिकाणी मंगळवारी पहाटे ६.३० ते ७.०० वाजण्याच्या सुमारास एका तीन मजली जुन्या इमारतीला भीषण आग लागली. चंगेडिया यांच्या मालकीच्या इमारतीत असलेल्या ए एस मार्केटिंगचे मोठे गोदाम या आगीत जळून खाक झाले.सकाळच्या वेळी व्यायाम करणाऱ्या नागरिकांना दुकानातून धूर येत असल्याचे दिसल्याने एकच खळबळ उडाली. सदर परिसरात लाकडी वस्तू व बांबूचा व्यवसाय असल्याने, तसेच गोदामात कॅडबरीसह किरकोळ मालाचा साठा असल्याने आगीने काही क्षणातच विकराळ रूप धारण केले.

ही आग शॉर्टसर्किटमुळे लागली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. दरम्यान महापालिकेच्या अग्निशमन विभागाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन विभागाची गाडी तातडीने पोहोचली. परंतु, सुरुवातीला आगीने रौद्र रुप धारण केल्याने महानगरपालिकेचे अग्निशमन दल आग विझविण्यात अपयशी ठरत होते. तसेच शटर तोडण्यासाठी हातोडे, ब्रेकर यांसारख्या अत्यावश्यक साधनांचा अभाव होता, अशी तक्रार नागरिकांनी केली. मनपाची यंत्रणा पूर्णपणे अपयशी ठरल्याचे चित्र होते. परिस्थितीचे गांभीर्य पाहून आमदार संग्राम जगताप यांनी तात्काळ सैन्य दलातील अग्निशमन वाहनांना (बंबांना) पाचारण केले. दरम्यान, महानगरपालिकेच्या बचाव पथकाने (रेस्यू पथक) तातडीने शेजारील सात ते आठ घरे रिकामी केली. अखेरीस, मनपा आणि सैन्य दलाच्या २० ते २२ अग्निशमन वाहनांनी अथक प्रयत्नानंतर या भीषण आगीवर नियंत्रण मिळवले. मनपा आयुक्तांनीही घटनास्थळी धाव घेऊन घटनेचा आढावा घेतला. या दुर्घटनेत लाखोंचे नुकसान झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही .

# पूर्णा नगराध्यक्षांसह १२४ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद

## स्ट्राँग रुमला २४ तास कडेकोट बंदोबस्त



परभणी। प्रतिनिधी

पूर्णा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी मंगळवारी (दि. २) पार पडलेली मतदान प्रक्रिया किरकोळ अडचणी वगळता सुरळीत पार पडली. ११ प्रभागांसाठी उभारलेल्या ३८ मतदान केंद्रांवर सकाळी ७.३० वाजता मतदानास सुरुवात झाली. ठरलेल्या ५.३० नंतरही काही केंद्रांवर मतदार रांगेत असल्याने रात्री उशिरापर्यंत मतदान सुरूच राहिले. वेळेत मतदान केंद्रात दाखल झालेल्या मतदारांना केंद्रप्रमुखांनी टोकन दिल्याने सर्वांनी आपला मताधिकार बजावला.

एकूण ३३,७७४ पैकी २३,७५५ मतदारांनी मतदान केल्याची अधिकृत नोंद असून, मतदानाचा टक्का ७०.३४ इतका नोंदवला गेला आहे. दरम्यान, नागपूर खंडपीठाच्या आदेशानुसार ३ डिसेंबर रोजी होणारा निकाल स्थगित ठेवण्यात आला असून आता निकाल २१ डिसेंबररोजी जाहीर होणार आहे. त्यामुळे उमेदवार आणि कार्यकर्त्यांची उत्सुकता चांगलीच ताणली गेली आहे. नगराध्यक्ष पदासाठी १४ आणि इतर पदांसाठी ११० असे मिळून एकूण १२४ उमेदवारांचे भवितव्य तहसील कार्यालयातील स्ट्राँग रूममध्ये सीलबंद ठेवण्यात आलेल्या ३८ ईव्हीएममध्ये बंद झाले आहे. स्ट्राँग रूमला राज्य राखीव पोलीस दलासह स्थानिक पोलिसांचा २४ तास कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. निकाल उशीर झाल्याने मतदार आणि कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेली उत्सुकता सध्या थोडी शमली आहे. या निवडणुकीत विजय निश्चित करण्यासाठी प्रमुख पक्षांसह अपक्ष उमेदवारांनी प्रतिष्ठेचे प्रयत्न केले. खासदार, आमदारांच्या सभा, कॉर्नर मिटिंग्ज, रॅली, घर-दारी भेटी आणि लाऊडस्पीकरच्या प्रचारातून १ डिसेंबर रात्री १० वाजेपर्यंत प्रचाराचा जोर कायम राहिला. दरम्यान, काही उमेदवारांनी मतदारांना आकर्षित करण्यासाठी 'लक्ष्मीअस्त्र' वापरल्याची चर्चा शहरात रंगत आहे. परिणामी कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाल्याचे बोलले जात आहे. मतदानानंतर शहरात विविध बूथवरील परिस्थिती, कोणत्या उमेदवाराला किती मते मिळू शकतात याबाबत कार्यकर्ते आकडेमोड करत आहेत. तरीही, सर्वांच्या नजरा मतमोजणीकडे लागल्या आहेत.

# मनपा अग्निशमन विभागात कमतरता, आ.जगताप यांचे मोठे विधान

अहिल्यानगर। प्रतिनिधी

शहरात आता मोठमोठ्या बहुमजली इमारती उभ्या राहत असल्याने महानगरपालिकेची अग्निशमन यंत्रणेचे अजून बळकटीकरण, अधिक सुसज्ज व अत्याधुनिक करण्याची गरज आहे. तसेच प्रशिक्षित तांत्रिक कर्मचाऱ्यांचीही कमतरता भासत आहे. याची मागणी मागच्या अधिवेशनात राज्य सरकारकडे केली आहे. त्याचा पाठपुरावा सुरु आहे. नव्या इमारतीमध्ये आग प्रतिबंध यंत्रांना असते. पण जुन्या इमारतीत असल्याने लवकर आग नियंत्रणात येत नाही. अशा घटना घडू नये यासाठी काळजी घेणे आवश्यक आहे. बुरुडगल्लीमध्ये जुन्या इमारतीला लागलेल्या आगीत चंगेडीया परिवाराचे प्रचंड नुकसान झाले आहे. सुदैवाने जीवित हानी झाली नाही. शासनाकडून त्यांना मदत मिळण्यासाठी प्रयत्न करू, अशी महिती आ.संग्राम जगताप यांनी दिली.

मंगळवारी सकाळी बुरुडगल्ली मधील चंगेडीया परिवाराच्या जुन्या इमारतीला आग लागण्याची घटना घडल्यावर आ.संग्राम जगताप यांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीची पाहणी केली. तसेच चंगेडीया परिवाराची भेट घेऊन त्यांना आधार दिला.

यावेळी सचिन चंगेडीया, बाळू भंडारी, माजी सभापती अविनाश घुले, माजी नगरसेवक सुनील त्रिंबके, आर.के रासकर, आसाराम रासकर आदीसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# मुद्रेगाव येथील वाळू उपसालिलाव रद्द करा ; ग्रामस्थांची मागणी

घनसावंगी । प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील मुद्रेगाव येथील दिं.०५ डिसेंबर रोजी होणारा वाळू उपसा जाहीर लिलाव हा रद्द करावा अशी मागणी जिल्हाधिकारी जालना यांना दिलेल्या निवेदनात ग्रामस्थांनी केली आहे.

सदरील गावांतील ग्रामसेवक , सरपंच यांनी आपल्या गावांसाठी विविध विकास कामांसाठी निधी मंजूर करायचा म्हणून गावांतील अनेकांच्या सह्या घेतलेल्या असून त्याचा गैरवापर करून वाळू घाट उपसा लिलावास जोडल्याचे माहिती झाल्याने त्वरित दिं.०२ डिसेंबर रोजी जालना जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले आहे.

वाळू घाट उपसा लिलावसाठी निवेदनावर सह्या करणाऱ्या सर्वच ग्रामस्थांचा विरोध असून त्यास कोणाचीही संमती नाही तसेच वाळू उपस्यामुळे गावांतील रस्ते खराब होतात, शाळेतील विद्यार्थी यांना परीक्षेचे दिवस असल्याने त्यांना त्रास होतो त्यातच गावात गुंड प्रवृत्ती पुन्हा वाढीस लागते अशी अनेक कारणे आहेत त्यामुळे गावाचे जनजीवन विस्कळीत होते असे निवेदनात नमूद केलेले आहे निवेदनावर अनेक ग्रामस्थांच्या सह्या आहेत.लिलाव रद्द न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करत जीवे मारण्याची धमकी

अहिल्यानगर प्रतिनिधी

येथील एका अल्पवयीन शाळकरी मुलीचा पाठलाग करून, धमकावून आणि वारंवार जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवत अत्याचार केला. अत्याचार करणारा संशयित युवकाची इंस्टाग्रामवरून ओळख झाल्यानंतर तो पीडितेला वारंवार त्रास देत असल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीने (वय १५) दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात संशयित आरोपी युवकाविरूध्द विनयभंग, अत्याचार, पोक्सो आदी कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पीडित मुलगी अहिल्यानगर येथील एका शाळेत शिक्षण घेते असून, इंस्टाग्रामवरून तिची आरोपीसोबत ओळख झाली होती. त्यानंतर आरोपीने मुलीच्या शाळेजवळ येऊन तिचा पाठलाग करणे सुरू केले. १७ जुलै २०२५ रोजी सायंकाळी मुलीला थांबवून आरोपीने तिचा हात धरून तिला ओढण्याचा प्रयत्न केला. मुलीने आरडाओरड केल्यावर आरोपीने तिला व तिच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी दिली. या धमकीनंतर त्याने मुलीला अनेक वेळा शाळा सुटल्यावर धमकावून आपल्या दुचाकीवरून घेऊन जात होता. तपोवन रस्ता परिसरात सुरू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी नेऊन त्याने तिच्यासोबत गैरवर्तन केले.

२७ ऑक्टोबर २०२५ रोजी मुलीचे पेपर सुरू असताना, तिला पुन्हा धमकी देऊन तपोवन रस्त्यावरील बांधकाम सुरू असलेल्या घरी नेले. तेथे जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. विरोध केल्यावर तिला मारहाणही केली. यानंतर २८ आणि २९ ऑक्टोबर तसेच २१ आणि २४ नोव्हेंबर या दिवशीही आरोपीने मुलीला धमकावून याच ठिकाणी नेऊन अत्याचार केले. आरोपीने पीडितेला आणि तिच्या पालकांना गायब करून जीवे मारण्याची धमकी दिली होती.

या संपूर्ण प्रकारानंतर अल्पवयीन पीडितेने धाडस करून आईच्या उपस्थितीत पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# केदारखेडा येथे अपघात, दोन ठार एक जखमी

जालना। प्रतिनिधी

ट्रकला ओव्हरटेक करण्याच्या नादात झालेल्या अपघातात दोन अल्पवयीन मुलांचा मृत्यू झाला तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना भोकरदन तालुक्यातील केदारखेडा येथे घडली. या घटनेविषयी अधिक माहिती अशी की सुरज संजय राऊत (१७) आणि आयुष सतीश पवार (१५) व अभय बारवकर (तिघेही रा.राजूर) हे तिघे भोकरदनवरून राजूरकडे एमएच २८, एयू ६६१८ या क्रमांकाच्या दुचाकीने जात होते. यावेळी समोरच्या वाहनाला ओव्हरटेक करण्याच्या नादात जालन्याकडून भोकरदनकडे येणाऱ्या ट्रक एमएच २१, एएक्स ६२९९ ची दुचाकीला समोरून जोराची धडक बसली. या धडकेत दुचाकीवरील सुरज संजय राऊत आणि आयुष सतीश पवार दोघांचा जागीच मृत्यू झाला तर अभय बारवकर हा गंभीर जखमी झाला आहे.दरम्यान, परिसरातील शेतकऱ्यांनी तत्काळ पोलिसांना फोन करून याची माहिती दिली. हसनाबाद ठाण्याचे राठोड यांनी घटनास्थळी धाव घेत जखमीला केदारखेडा आरोग्य केंद्राच्या रुग्णवाहिकेमार्फत भोकरदन ग्रामीण रुग्णालयात हलविले. तर अपघातील इतर दोघांना राजूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केलं. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केलं. या अपघातील ट्रकचा मालक फिरोज खान (रा. जालना) तर चालक विलास अर्दाड (रा. बीड) असून अपघातील दुचाकी ही नितीन खेत्रे (रा. देऊळगाव, ता. मेहकर) यांच्या मालकीची असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या अपघाताची भोकरदन पोलिस ठाण्यात नोंद घेण्यात आली आहे. समोरासमोर झालेल्या या अपघातात शाळकरी मुलांचा जीव गेल्यानं परिवारात हळहळ व्यक्त केली जात आहे. अल्पवयीन वाहनचालकांना प्रतिबंधित करावं, अशी मागणी सध्या परिसरात जोर धरत आहे.

# कै.दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात गीता जयंती साजरी

अंबड । प्रतिनिधी

शहरातील कै.दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात आज (ता.१) सोमवारी गीता जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दिप प्रज्वलन तसेच भगवद गीता ग्रंथाच्या पूजनाने करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाच्या सुरुवातीला 'भारत देश महान' हे सांघिक गीत घेण्यात आले. या कार्यक्रमास स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व्यंकटेश गोसावी, समिती कार्यवाह केदार मंत्री, गीताव्रती सौ.निर्मलाताई उपाध्ये, अंबड तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष जिगे, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य डॉ. राजेंद्र भाला व तुकाराम तौर यांच्यासह प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप जोशी आणि माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुधाकर घायतडक यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. या कार्यक्रमात सौ.निर्मलाताई उपाध्ये यांनी भगवद गितेचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्व या विषयावर मौलिक मार्गदर्शन केले, त्यांनी आपल्या मार्गदर्शनात म्हटले की,भगवद गीता ही शास्त्र, तत्त्वज्ञान असून त्यातील सिद्धांत त्रिकाल बाधित सत्य आहे. जो विद्यार्थी गीतेने सांगितलेल्या मार्गावर वाटचाल करील त्याला यश शंभर टक्के मिळणारच असा विश्वास व्यक्त करतांनाच राष्ट्र बलवान होण्यासाठी विद्यार्थ्यांनी बालपणापासून गीतेचे ज्ञान आत्मसात करावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.या कार्यक्रमात मुख्याध्यापक प्रदीप जोशी यांच्या नेतृत्वाखाली गीतेच्या बाराव्या अध्यायाचे पठण शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व मान्यवर यांनी केलेकार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती अनुराधा भाकरे यांनी तर ऋणनिर्देश श्रीमती निशा जोशी यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक प्रदीप जोशी यांनी केले.कार्यक्रमात काही विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाची वेशभूषा धारण केली होती.त्यामुळे ते लक्षवेधी ठरले.या कार्यक्रमाला शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता संपूर्ण वंदे मातरमने झाली.कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.




### या विद्यालयात विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरचं संस्काराची शिदोरीही दिली जाते-संतोष जिगे

गीता जयंती कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी संतोष जिगे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हटले की,कै.दत्ताजी भाले शैक्षणिक संकुल हे केवळ विद्यार्थी घडवणारे नव्हे तर सुसंस्कारीत विद्यार्थी घडविणारे संकुल असल्यामुळे या विद्यालयाचे विद्यार्थी हे सर्वचं क्षेत्रात हमखास यशस्वी होतात. इथे सर्वं विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरचं संस्काराचीही शिदोरी दिली जाते.विद्यालयात संस्कृती,राष्ट्रनिष्ठा जोपासणारे उपक्रम सातत्याने घेतले जातात असे सांगतानाच त्यांनी शेवटी असे उपक्रम राबविण्यासाठी तसेच पुढील वाटचालीसाठी शाळेला शुभेच्छा दिल्या.

### टीसी हरवला आहे

भरत रावसाहेब वामन मु .पो.गहुखेल ता . आष्टी.जि. बीड म्हसोबावाडी ते पुणे प्रवास करीत असताना एस टी महामंडळ मध्ये टीसी गहाळ झाला असुन कोणाला सापडल्यास खालील दिलेल्या फोन नंबर वर संपर्क करावा ही विनंती.

**भरत वामन**
**७२१८४७६०६३**

# जिल्ह्यात ७२.२५ टक्के मतदान

अहिल्यानगर । प्रशांत बाफना

जिल्ह्यातील संगमनेर, राहाता, शिडी, श्रीरामपूर, शेवगाव, श्रीगोंदा, राहुरी व जामखेड या आठ नगरपालिकांसाठी मंगळवारी ७०.२५ टक्के मतदान झाले. सर्वाधिक मतदान श्रीगोंदेत ७२.२५ इतके झाले असून, श्रीरामपूरात ६६.६२ टक्के इतके मतदान झाले. या पालिकांची मतमोजणी २१ डिसेंबरला होणार असून, तोपर्यंत उमेदवारांचा जीव भांड्यात पडला आहे.

जिल्ह्यातील आठ नगरपालिकांच्या नगराध्यक्ष पदांच्या आठ तर नगरसेवक पदांच्या १८९ जागांसाठी मंगळवारी (दि.२) सकाळी ७.३० वाजता मतदान प्रक्रियेस प्रारंभ झाला. पहिल्या दोन तासांत ७.३१ मतदान झाले. दुपारी साडेतीन वाजेपर्यंत ५०.२९ टक्के मतदान झाले. सायंकाळी पाच वाजेनंतर श्रीगोंदा, जामखेड, शिर्डी, राहाता, श्रीरामपूर, संगमनेरसह पालिकांमध्ये मतदानासाठी रांगा लागल्या होत्या. मतदानाची वेळ संपून गेल्यानंतरही मतदानासाठी काही मतदान केंद्रांवर गर्दी झाल्याचे पहावयास मिळाले.आठ नगरपालिकांसाठी एकूण ७२.२५ टक्के इतके मतदान झाले. सर्वाधिक मतदान श्रीगोंदे नगरपालिकेसाठी ७९.८४ टक्के झाले. त्याखालोखाल राहाता ७७.८७ टक्के, जामखेड ७५.६३, शिर्डी ७५.१६, संगमनेर ७२.७५, राहुरी ७२.४६, शेवगाव ६९.०४ तर श्रीरामपूर नगरपालिकेसाठी ६६.६२ टक्के इतके मतदान झाले आहे. ७७८ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले असून, आता २१ डिसेंबरला सकाळी मतमोजणी होणार आहे. याशिवाय निवडणूका स्थगित झालेल्या कोपरगाव, देवळाली, नेवासा व पाथर्डी या नगपालिकांसह १२ ठिकाणच्या सदस्यपदांच्या निवडणूका २० डिसेंबरला होणार आहे. २१ डिसेंबरला बारा नगरपालिकांची मतमोजणी होणार आहे. मतमोजणी लांबणीवर पडल्यामुळे उमेदवारांची घालमेल वाढणार आहे. जिल्ह्यात शांततेत आणि सुरळीत मतदान झाल्याचा दावा जिल्हा प्रशासनाने केला आहे



### सर्वाधिक ७९.८४ टक्के मतदान श्रीगोंद्यात : २१ डिसेंबरला मतमोजणी



राज्य लोकतंत्र सत्तातंत्र
गुरुवार दि. ०४ डिसेंबर २०२५ | ६

# वडवणी कृषी कार्यालयात 'हम करे सो कायदा' - शेतकऱ्यांचा छळ शिगेला!

## वडवणी तालुका कृषी कार्यालयातील मनमानी कारभाराची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार !

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी असणारे तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अधिकारी, कर्मचारी गैरहजर असतात तसेच कृषी सहाय्यक हे सज्जाचे गावी जात नाहीत तसेच कार्यालयात कामासाठी आलेल्या शेतकऱ्यांची आडवणुक केली जाते. या ठिकाणी कार्यरत असणारे अधिकारी व कर्मचारी हम करे सो कायदाची शेतकऱ्यांना प्रचिती येत असल्याने या मनमानी कारभाराची जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार करण्यात आली असून यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी नसता



शेतकऱ्यांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा महादेव सावंत यांनी जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी असणारे तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी हे तालुका कृषि कार्यालयात, तसेच कृषि सहाय्यक हे प्रत्येक गावोगावी जात नसुन ते कार्यालयात देखीत सतत गैरहजर असतात तसेच अतिवृष्टीने नुकसान झालेल्या अनेक शेतकऱ्यांचे अनुदान यादीला नांवे आलेले नाहीत ते शेतकरी कृषि कार्यालयात कागदपत्रे देण्यासाठी जातत त्यावेळी कोणीही कर्मचारी, तेथे कधीही उपस्थित नसतात त्यामुळे शेतकऱ्यांची एक प्रकारे आडवणुक होत असुन यास कृषि कार्यालय जबाबदार आहे. तसेच पंतप्रधान सन्मान निधीचे तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांना पैसे खात्यावर येत नाहीत यासाठी करण्यात येणारी ऑनलाईनच्या केवायसी साईट देखील सतत बंद असते त्यामुळे अनेक शेतकरी यापासुन वंचित राहत आहेत. तरी सदरील प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी वेबसाईट ही २४ तास चालु ठेवण्यात यावी. तसेच सदरील अधिकारी, कर्मचारी, कृषि सहाय्यक यांना शेतकऱ्यांचे कामे करण्यासाठी प्रत्यक्ष कार्यालयात व सज्जाच्या ठिकाणी हजर राहण्याचे आदेश देवुन ज्या शेतकऱ्यांचे अतिवृष्टी अनुदानातुन नांवे यादीत आलेले नाहीत त्यांचा सर्वे करुन पुर्तता करण्यात यावी व जे अधिकारी, कर्मचारी, कृषि सहाय्यक हे कार्यालय व सज्जाच्या गावी हजर राहत नाहीत याची चौकशी करून तात्काळ कारवाई करण्यात यावी नसता शेतकऱ्यांना सोबत घेऊन भाजपाच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशारा दि.२८ रोजी जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

### कामकाजाचे दिवस ठरलेले?

या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी सतत गैरहजर असल्याचे शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे. तर आठवड्यातील सोमवार, बुधवार आणि शुक्रवार या तीन दिवशीच अधिकारी व कर्मचारी या कार्यालयात दिसून येतात. अशी खात्रीलायक माहिती मिळाली आहे. शासन तर यांना दर दिवशीचा पगार देते. मग अधिकारी आणि कर्मचारी एक दिवसाआड कार्यालयात हजेरी का लावतात ? उपस्थित दिवशीच शेतकऱ्यांचे कामे होतात हे कशावरून समजायचे ? याकडे देखील वरिष्ठ पातळीवरील अधिकारी व बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी लक्ष देणार का ? असा प्रश्न उपस्थित राहत आहे

# वडझडीमध्ये बिबट्याचा हल्ला; प्रयागाबाई सानप गंभीर जखमी

**पाटोदा । प्रतिनिधी**

**वडझडी गावात मंगळवारी रात्री भीषण घटना घडली. घरात घुसलेल्या बिबट्याने केलेल्या हल्ल्यात प्रयागाबाई किशन सानप (वय ६५) गंभीर जखमी झाल्या. रात्रीच्या वेळी अचानक घरात शिरलेल्या बिबट्याने त्यांच्यावर झडप घेतल्याने घरातील सदस्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि गावभर एकच गोंधळ उडाला.**

जखमी झालेल्या प्रयागाबाई सानप यांना स्थानिकांच्या मदतीने तातडीने उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आले. त्यांच्या प्रकृतीबाबत



पुढील उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर गावात प्रचंड दहशत पसरली असून, नागरिक विशेषत: रात्रीच्या वेळी घराबाहेर जाण्यास घाबरत आहेत. घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. विभागाकडून नागरिकांनी सतर्क राहावे, घरांच्या भोवती प्रकाशव्यवस्था वाढवावी आणि कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, रोहितवाडीचे सरपंच संजय सानप यांनीही परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांना विशेष सतर्कतेचे आवाहन केले आहे. अलीकडच्या काळात वडझडीसह पंचक्रोशीतील अनेक ठिकाणी बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याचे त्यांनी सांगितले.

### सरपंच संजय सानप यांचे आवाहन

शेतात काम करताना सर्वांनी दक्षता घ्यावी. लहान मुलांना रानात न नेता सुरक्षित ठेवा. बिबट्या दिसल्यास त्याच्याकडे पाहत शांतपणे दूर जावे. शक्यतो रात्रीच्या वेळी शेतात जाणे टाळावे. ग्रामस्थांनी सतर्क राहून प्रशासनाला सहकार्य करावे आणि वनविभागाने तातडीने उपाययोजना करून बिबट्याचा शोध घेण्याची मागणी वाढत आहे.

# हल्ल्या प्रकरणात तपास पूर्ण होण्यापूर्वी आ. धस यांच्यावर आरोप करणे चुकीचे -ढाकणे

शिरूर कासार । प्रतिनिधी

राष्ट्रवादीचे कार्यकर्ते राम खाडे यांच्यावर झालेला हल्ला हा अतिशय निंदनीय आणि गंभीर प्रकार असला तरी, हा मामला पोलिस तपासाच्या टप्प्यात असताना आमदार आ. सुरेश धस यांच्यावर कोणतेही ठोस पुरावे नसताना आरोप करणे ही अत्यंत गैरजबाबदार आणि दिशाभूल करणारी कृती असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते नवनाथ ढाकणे यांनी व्यक्त केले आहे.

ढाकणे म्हणाले, राम खाडे



माझे जवळचे मित्र आहेत. त्यांनी संयम बाळगावा. पोलीस या प्रकरणाची चौकशी करत आहेत. तपास पूर्ण होण्यापूर्वी कोणावरही आरोप करून गोंधळ निर्माण करणे योग्य नाही.

त्यांनी स्पष्ट केले की, काही व्यक्ती प्रसिद्धीच्या हव्यासापोटी आणि राजकीय हेतूने आमदार सुरेश धस यांच्यावर खोटे, बनावट व निराधार आरोप करत आहेत. सोशल मीडियावर हेतुपुरस्सर आमदार धस यांचे नाव पुढे केले जात असून, त्यांच्या प्रतिमेला तडा देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

ढाकणे यांनी अशा कृतीचा तीव्र निषेध नोंदवत म्हटले,

आमचे लोकनेते आ. सुरेश धस यांच्याशी या प्रकरणाचा दूरदूरपर्यंत काहीही संबंध नाही. तरीही त्यांना राजकीयदृष्ट्या टार्गेट करण्याचा स्वस्त प्रयत्न काही जण करीत आहेत. नाहक बदनामी करणे ही अतिशय केविलवाणी प्रवृत्ती आहे.ते पुढे म्हणाले, राम खाडे यांच्यावर झालेला हल्ला गंभीर आहे, त्याची सखोल चौकशी व्हायलाच हवी. परंतु त्या घटनेचा धस साहेबांशी संबंध नसतानाही त्यांच्यावर सकाळ-दुपार-संध्याकाळ सोशल मीडियावर खोटारडे आरोप करण्यात येत आहेत. पुरावे नसताना माध्यमांसमोर ◀◀ पान ३ वर

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये संविधानाचा जागर कार्यक्रम संपन्न

किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयांमध्ये शासनाच्या परिपत्रकानुसार जागरण संविधानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक श्री. पुरुषोत्तम स्वामी समाज कल्याण विभाग बीड, बार्टी श्री. ढगे यांनी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानातील मूलभूत हक्क, कर्तव्य याची सविस्तर



माहिती सांगितली. भारतीय संविधान दस्ताऐवज नाही. तर तो जीवन जगण्याचा मार्ग आहे. संविधानाची मूल्ये स्वातंत्र्य समता, बंधुता, न्याय हे प्रत्येकाने आचरणात आणले पाहिजे असे सांगितले. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी या माध्यमातून ◀◀ पान ३ वर

# केंद्रीयमंत्री अमित शहा यांची आ.सुरेश धस यांनी घेतली भेट

## आष्टी मतदारसंघातील ५० तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी आ.धस यांचा पाठपुरावा

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी विधानसभा मतदारसंघातील धार्मिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वपूर्ण तीर्थक्षेत्रांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र शासनाच्या प्रसाद योजना अंतर्गत विशेषबाब म्हणून निधी मंजूर व्हावा, यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची दिल्ली येथील संसद भवनात आमदार सुरेश धस यांनी भेट घेतली.

आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यांत असंख्य प्राचीन,ऐतिहासिक व श्रद्धास्थानांची परंपरा व पर्यटन लाभलेली तीर्थक्षेत्रे आहेत.दरवर्षी हजारो भाविक, वारकरी आणि पर्यटक या ठिकाणी भेट देतात. मात्र, अनेक तीर्थस्थळांवर रस्ते, स्वच्छता, पाणी, विश्रामगृहे, प्रकाशयोजना यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने त्यांचा अपेक्षित विकास झालेला नाही.ही बाब लक्षात घेऊन प्रसाद योजना (तीर्थयात्रा पुनरुज्जीवन आणि आध्यात्मिक संवर्धन मोहीम) अंतर्गत आष्टी मतदारसंघातील सुमारे ५० तीर्थक्षेत्रे व पर्यटन स्थळांना निधी उपलब्ध करून देण्याची ठाम मागणी आ.धस यांनी केली. याबाबत संबंधित विभागाकडून तातडीने कार्यवाही करावी, अशी विनंतीही आष्टी मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांनी केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्याकडे यावेळी केली.या निधीमुळे तीर्थस्थळांचा सर्वांगीण विकास होऊन भक्तांसाठी सुविधा वाढतील, धार्मिक पर्यटनाला चालना मिळणार असल्याने मतदारसंघातील भाविकांनी आभार मानले आहेत.



# आष्टी वकील संघाच्या अडचणी शासन दरबारी मांडू -शंकर देशमुख

## भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या हस्ते आष्टीत वकील दिनानिमित्त वकीलांचा सत्कार

आष्टी । प्रतिनिधी

जागतीक वकील दिना निमित्त भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष श्री शंकर देशमुख यांच्या वतीने आष्टी न्यायालयातील वकील बंधू भगिनींचा शाल पुष्प देऊन सन्मान करण्यात आला

भारतात दरवर्षी ३ डिसेंबर रोजी वकील दिन साजरा केला जातो. हा दिवस भारताचे पहिले राष्ट्रपती आणि विधिज्ञ असलेल्या डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या जयंतीनिमित्त साजरा होतो. या दिवशी वकील समुदायाच्या योगदानाचा, सामाजिक न्यायाला प्रोत्साहन देण्याच्या त्यांच्या भूमिकेचा आणि



कायद्याच्या राज्याला टिकवून ठेवण्याच्या त्यांच्या कार्याचा सन्मान केला जातो वकील समाजाला न्याय मिळवून देण्यात, लोकशाही आणि मानवाधिकारांचे संरक्षण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. या दिवशी त्यांच्या या भूमिकेवर प्रकाश टाकला जातो आणि म्हणूनच भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष ◀◀ पान ३ वर

# लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या वतीने २७७५ प्रतिटना प्रमाणे पहिली ऊचल जाहीर

माजलगाव । प्रतिनिधी

लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या वतीने आयोजित बैठकीत आमदार प्रकाश सोळंके यांनी उसाच्या पहिल्या हप्त्याची २७७५/ प्रति टन अशी मोठी घोषणा केली.तसेच अंतिम बील कारखान्याच्या उत्पादनानुसार निश्चित करण्यात येईल,अशी स्पष्ट सूचना त्यांनी बैठकीत दिली

शेतकऱ्यांच्या हितासाठी नेहमीच खंबीरपणे उभे राहणाऱ्या आमदार प्रकाश सोळंके यांच्यावर काहींनी अनाठायी टीका करून नकारात्मक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला.पण आजच्या निर्णयाने पुन्हा एकदा सिद्ध झाले की आ.सोळंके हे



नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असतात.

नकारात्मकता पसरवणाऱ्यांचे प्रयत्न फोल ठरले आणि सत्याचा विजय झाला.छत्रपती सहकारी साखर कारखान्यांकडून पहिली उचल: २७५०/तर जय महेश साखर कारखान्यांकडून पहिली उचल: २७५०

फक्त आमदार प्रकाश सोळंके यांच्या कारखान्याने या दोन्हींपेक्षा २५ रुपये अधिक देत २७७५) अशी उचल जाहीर केली.शेतकऱ्यांच्या फायद्याचा विचार करून अधिक रक्कम जाहीर केल्याबद्दल आमदार प्रकाशदादा सोळंके यांचे शेतकऱ्यांकडून आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

# उसाचा दर जाहीर, शेतकरी एकजूटीचा विजय -राजेंद्र आमटे

## साखर कारखाने पहिला हप्ता २७७५ रु; गुळ उद्योग यांनी तत्काळ पहिला हप्ता जाहीर करावा!

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव मधून सुरू झालेलं ऊस भाववाढ आंदोलन आज हे बीड जिल्हा व संपूर्ण मराठवाड्यात पेटले. माजलगाव तालुक्यातील संपूर्ण युवा शेतकरी संघर्ष समितीच्या तरुण युवकांनी संघर्ष करत २४०० रु. पहिला हप्ता देऊ म्हणणारे कारखानदार हे पहिला हप्ता २७७५ रु.देण्यास तयार झाले असून हा शेतकरी एकजुटीचा विजयी असल्याचे मत शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे जिल्हाप्रमुख राजेंद्र आमटे यांनी व्यक्त केले.

माजलगाव तालुक्यातील ऊस भाववाढ आंदोलनाला पाठिंबा देत बीड जिल्ह्यातील संपूर्ण शेतकरी हा माजलगाव मधील आंदोलनकर्त्या पोरांच्या पाठीमागे उभा राहिला. बीड तालुक्यातील पिंपळनेर परिसरात बेडकुचीवाडी, सांडरवन, लिंबारूई, कुर्ला, आहेर चिंचोली, रंजेगाव , मुग्गाव, पाटेगाव, पिंपळादेवी, सुर्डि, तांदळवाडी, नांदुर, खामगाव, येतील शेतकरी हा या आंदोलनात सहभागी झाला अनेक ठिकाणी बीड मधील पिंपळनेर



परिसरात, आहेर चिंचोली परिसरातील शेतकरी हा माजलगाव मधील आंदोलनात सहभागी झाला. वाढते आंदोलनच लोन पाहता कारखानदार व शेतकरी पुत्र यांच्या मध्ये बैठका झाल्या व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बजरंग सोनवणे यांच्या येडेश्वरी कारखाना २८०० पहिला हप्ता, सुंदरराव सोळुंके कारखाना तेलगाव, जय महेश कारखाना २७७५ रु छत्रपती कारखाना २७५० रु देण्यास तयार झाले. त्यांचे आभार बीड तालुक्यातील गुळ उद्योग यांनी आपले दर जाहीर करण्यात यावेत.

या कडे शेतकऱ्याचे लक्ष केंद्रित झाले आहे. या वेळी बीड तालुक्यात पिंपळनेर परिसरात राजेंद्र आमटे, राजू वीर, शेतकरी पुत्र धनंजय गुंदेकर,मुगगाव येथील तुकाराम दुबाले, भागवत (हानुमान) दुबाले, आण्णासाहेब दुबाले व जिजाभाऊ दुबाले तसेच बेडकुचीवाडी येथील शेतकरी रूपांगत जाधव, अशोक काशीद, माऊली जाधव, गणेश चिंचकर सांडरवन येथील शेतकरी पवनराजे दुबाले, राजेंद्र धुरवडे, लिंबरूई देवी येथील शेतकरी बालासाहेब पैठणे, ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# रिव्हर्स घेताना दुर्लक्ष, ५ वर्षांच्या साईनाथच्या डोक्यावरुन गेलं चाक, विना परवाना चालवत होता स्कूलबस

**पुणे । प्रतिनिधी**

विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या शाळेच्या बसच्या धडकेत पाच वर्षांचा बालकाचा मृत्यू झाला असून, त्याची आईदेखील गंभीर जखमी झाली आहे. ही घटना मंगळवारी (दि. २) सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास हडपसर-सासवड रस्त्यावरील उरुळी देवाची परिसरात घडली होती. याप्रकरणी फुरसुंगी पोलिसांनी विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसचालकाला अटक केली आहे. तर मोडक इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक, मुख्याध्यापकासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. साईनाथ तुळशीराम भंगारे (वय ५) असे मृत्युमुखी पडलेल्या बालकाचे नाव आहे. अपघातात साईनाथची आई रेखा तुळशीराम भंगारे (वय २८, रा. गणराज हाईट्स, सावली होम सोसायटीजवळ, उरुळी देवाची, हडपसर-सासवड रस्ता) गंभीर जखमी झाल्या आहेत. रेखा यांनी याबाबत फुरसुंगी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.




त्यानुसार पोलिसांनी बसचालक संस्कार अनिल भोसले (रा. पांडवनगर, वडकी, हडपसर-सासवड रस्ता) याला अटक केली आहे. तर मोडक इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक संजय वसंत मोडक, मुख्याध्यापिका डॉ. आरती जाधव, विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसच्या मालक मनीषा संजय मोडक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साईनाथ उरुळी देवाची परिसरातील एका शाळेत शिशूगटात होता. मंगळवारी (दि.२ डिसेंबर) सकाळी साडेसातच्या सुमारास त्याची आई रेखा या त्याला शाळेत सोडण्यासाठी धनगरवस्तीकडे जाणाऱ्या रस्त्याने पायी चालत निघाल्या होत्या. त्यावेळी शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या बसने रिव्हर्स घेत असताना रेखा आणि साईनाथ यांना धडक दिली. धडक एवढी जोरात होती की, साईनाथच्या डोक्यावरून बसचे चाक गेले. तर रेखा यांच्या डोक्याला, हातापायाला गंभीर दुखापत झाली.

अपघातानंतर साईनाथ आणि रेखा यांना नागरिकांनी तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले. उपचारांपूर्वीच साईनाथ याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. अपघाताची माहिती मिळताच फुरसुंगी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अमोल मोरे, गुन्हे शाखेचे निरीक्षक राजेश खांडे यांनी घटनास्थळी भेट दिली. याप्रकरणी सहायक पोलिस निरीक्षक किशोर पवार तपास करत आहेत.

नातेवाईकांचा आक्रोश

विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसच्या धडकेत पाच वर्षांच्या बालकाचा मृत्यू झाल्यानंतर नातेवाईकांच्या आक्रोशामुळे परिसरात शोककळा पसरली होती. फुरसुंगी भागातील एका शाळेची ही बस असल्याचे समजल्यानंतर नातेवाईकांनी शाळेचे प्रशासन, संस्थाचालक, विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. त्यानुसार पोलिसांनी चौघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अपघात प्रकरणी स्कूलबसच्या चालकाला पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडे बस चालविण्याचा वाहन परवाना नसल्याचे समोर आले आहे. शाळेचे संस्थापक, मुख्याध्यापिका आणि स्कूलबस मालक यांच्यासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# मगरपट्टा-मुंढवा उड्डाणपुलावर क्रेन पलटी; वाहतूक दोन तास ठप्प

**मुंढवा । प्रतिनिधी**

मगरपट्टा- मुंढवा रस्त्यावरील रेल्वे उड्डाणपुलावर मंगळवारी (दि.२) रात्री बारा वाजता एक अवजड क्रेन पलटी झाल्यामुळे उड्डाण पुलावरील एका बाजूची वाहतूक बुधवारी दुपारी तीन वाजेपर्यंत बंद होती. नंतर दुपारी तीन ते पाचदरम्यान क्रेन बाजूला काढण्यासाठी दोन तास वेळ लागला. यावेळी पुलावरील दोन्ही बाजूंचे रस्ते बंद केल्याने मुंढवा, घोरपडी व केशवनगर परिसरात मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर सर्वत्र प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती.



मुंढवा रेल्वे उड्डाणपुलावर रात्री क्रेन पलटी झाल्यामुळे रात्री उड्डाणपुलाची एक बाजू पूर्ण बंद होती. दुसऱ्या बाजूने बुधवारी दुपारी तीन वाजेपर्यंत वाहतूक सुरू होती. वाहतूक सुरळीत होण्यासाठी मुंढवा वाहतूक पोलिसांनी दुपारी तीन वाजता ही क्रेन काढण्यास सुरुवात केली.

क्रेन काढताना उड्डाणपुलावरील दुसऱ्या बाजूची वाहतूकही बंद करण्यात आली. त्यामुळे मगरपट्टा- मुंढवा या मुख्य रस्त्यावरील वाहतूक पूर्ण बंद झाली. यावर उपाययोजना म्हणून मगरपट्टा-खराडी या मुख्य रस्त्यावरील वाहतूक बी. टी. कवडे रोडमार्गे वळवण्यात आली. त्यामुळे घोरपडी, मुंढवा व केशवनगर तसेच खराडी रस्ता येथे प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. यामध्ये शालेय मुलांची वाहतूक करणाऱ्या बस, रिक्षा व व्हॅन अडकून पडल्यामुळे पालकांना काळजी लागून राहिली होती.

# मतदार यादीस महिन्याची मुदत द्यावी आम आदमी पक्षाची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेच्या निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार याद्यांत मोठ्या प्रमाणात त्रुटी असून अनेक नागरिकांची नावे चुकीच्या प्रभागात नोंदवली आहेत. त्यामुळे हजारो मतदार मतापासून वंचित राहण्याची शक्यता झाली आहे. अंतिम यादी प्रसिध्दीला एक महिन्याची मुदत द्यावी, अशी मागणी आम आदमी पक्षाचे शहर अध्यक्ष धनंजय बेनकर यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे निवेदनाद्वारे केली.



बेनकर यांनी सांगितले की, प्रभाग क्रमांक ३४ सह अनेक प्रभागांतील याद्या हजारो पृष्ठांच्या असल्याने नाव शोधणे अत्यंत कठीण होत आहे. प्रभाग ३४ मधील अनेक मतदारांची नावे चुकीने प्रभाग ३३ मध्ये टाकण्यात आली आहेत. त्रुटींच्या मोठ्या प्रमाणामुळे हरकतींसाठी दिलेले आठ दिवस अपुरे ठरत आहेत.हरकत नोंदवताना ओळखपत्र जोडणे, तांत्रिक अडचणी, तसेच अधिकारी किरकोळ चुका काढून अर्ज नाकारणे या कारणांमुळे नागरिकांना अडचणी येत आहेत. काही मतदारांची नावे जाणूनबुजून पसंतीच्या उमेदवार असलेल्या वॉर्डात टाकल्याच्या तक्रारी असून, अशा प्रकरणांची निवडणूक आयोगाने स्वतःहून पडताळणी करावी, अशीही मागणी बेनकर यांनी केली.

राज्यातील काही नगरपरिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका मतदानाच्या उंबरठ्यावर असताना पुढे ढकलण्यात आल्याने निवडणूक आयोग विनोदाचा विषय बनला आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस व प्रवक्ता सुनील माने यांनी केली. माने म्हणाले की 'एक देश, एक निवडणूक'ची चर्चा करणारे केंद्र सरकार आणि आयोग प्रत्यक्षात निवडणुका अखेरच्या क्षणी पुढे ढकलत आहेत. या कामकाजामुळे जनतेचा आयोगावरचा विश्वास कमी होत असून आगामी महापालिका व जिल्हा परिषद निवडणुका तांत्रिकदृष्ट्या व्यवस्थित आणि व्यावसायिक पद्धतीने घ्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

# हुबळी येथे झालेल्या भीषण अपघातात बारामतीतील दांपत्याचा मृत्यू, दोन्ही मुले किरकोळ जखमी

**बारामती । प्रतिनिधी**

कर्नाटक राज्यातील हुबळी येथे बारामतीतील दांपत्याचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. देवदर्शन करून येत असताना ही घटना घडली. अपघातात त्यांची दोन्ही मुले बचावले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. येथील श्रायबर




डायनामिक्स डेअरी इंडस्ट्रिजमध्ये कार्यरत असलेले अनिल सदाशिव जगताप (वय ५०) व त्यांची पत्नी वैशाली अनिल जगताप (वय ४५) हे दांपत्य त्यांची दोन्ही मुले अथर्व (वय २४) व अक्षता (वय २०) तिरुपतीला देवदर्शनासाठी गेले होते.

बुधवारी (ता. ३) पहाटे चारच्या सुमारास हुबळीनजिक एका ट्रकने अचानक ब्रेक दाबल्याने जगताप दांपत्यांची गाडी मागून जाऊन ट्रकवर आदळून हा अपघात झाल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांनी सांगितले. या अपघातात अनिल व वैशाली जगताप यांचा मृत्यू झाला. याच गाडीत असलेली दोन्ही मुले जखमी झाली असून त्यांच्यावर हुबळीतील रुग्णालयात उपचार सुरु असल्याचे सांगण्यात आले. याच गाडीमध्ये त्यांच्या नातेवाईकांचा एक लहान मुलगाही (१०) होता, सुदैवाने त्यालाही फारशी दुखापत झाली नाही. अनिल जगताप व वैशाली जगताप हे दांपत्य अत्यंत मनमिळावू होते, त्यांच्या अकाली जाण्याने बारामतीतील त्यांच्या मित्रपरिवाराला मोठा धक्का बसला. दरम्यान गुरुवारी (ता. ४) सकाळी बारामतीत या दांपत्यावर अंत्यसंस्कार केले जाणार असल्याची माहिती माजी उपनगराध्यक्ष अभिजित जाधव यांनी दिली.

# निलेश घायवळ गँगचा सक्रीय सदस्य अटकेत, घरी सापडली तब्बल ४०० काडतूस, तपासात धक्कादायक माहिती समोर

**पुणे । प्रतिनिधी**

निलेश घायवळ गँग संदर्भात धक्कादायक माहिती समोर आली आहे. निलेश घायवळ टोळीचा सक्रीय सदस्य असलेल्या अजय सरोदे याच्या घरी तब्बल ४०० काडतूस सापडली आहेत. २०० जिवंत काडतूस आहेत तर २०० रिकाम्या पुंगळ्या सापडल्या आहेत. अजय सरोदे आणि बटर्या चौधरी या दोघांना कोथरूड पोलिसांनी गाणगापूर, कर्नाटक येथून तीन दिवसांपूर्वी अटक केली आहे.



अजय सरोदे यांच्या चौकशीत माहिती समोर आल्यानंतर त्याच्या घराची झडती पोलिसांनी घेतली आहे. १७ सप्टेंबरला कोथरूड भागात घायवळ टोळीने एकावर गोळीबार केला होता त्यावेळी अजय सरोदे घटनास्थळी उपस्थित होता. त्यामुळं त्या गुन्ह्यात अजय सरोदे हा ही आरोपी होता. अजय सरोदे याच्याकडे पिस्तुल परवाना असल्याचं समोर आले आहे. त्याला २९ जानेवारी २०२४ ला पोलिसांनी पिस्तुली परवाना दिल्याची माहिती समोर आली आहे. पोलीस तपासानुसार, निलेश घायवळनं दहशत निर्माण करून बेकायदेशीररीत्या जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार केले असून, या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची अफरातफर केली आहे. तसेच खंडणी उकळणं आणि संशयास्पद आर्थिक व्यवहार केल्याचाही संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या सर्व घडामोडींचा सखोल तपास होऊन गैरव्यवहार उघडकीस यावेत, यासाठी पुणे पोलिसांनी ईडीला पत्र पाठवलं आहे. यासोबतच निलेश घायवळ याच्यावर ४५ लाख रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यात पुणे पोलिसांनी मोक्का अंतर्गत कारवाई केली आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, गुंड निलेश घायवळ टोळीवर आतापर्यंत तीन मोक्का अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कोथरूड परिसरातील गोळीबाराची घटना, कोयत्यानं हल्ला करण्याची घटना, तसेच कंपनीकडून झालेली मोठ्या प्रमाणातील आर्थिक देवाणघेवाण अशा विविध प्रकरणांमध्ये ही मोक्का कारवाई करण्यात आली आहे. या सर्व प्रकरणांचा तपास सध्या पोलिसांकडून वेगानं सुरू आहे. आणखी काही महत्त्वाचे तपशील लवकरच समोर येतील, अशी माहिती देखील मिळत आहे. निलेश घायवळ टोळीनं कमी किमतीत जमिनीचे व्यवहार तसेच मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार केल्याचं तपासात स्पष्ट झालं आहे. या सर्व घडामोडींनंतर विविध गुन्ह्यांच्या अनुषंगाने पोलिसांकडून अधिक तपास सुरु आहे.

# न्यायालयात ठेवलेली 'गीता' शाळेत आली तर गुन्हेगारी थांबेल : ह.भ.प. अशोक महाराज शिंदे यांचा प्रभावी उपदेश

**शिरूर । प्रतिनिधी**

भगवान दत्तात्रय जन्मोत्सवानिमित्त सविंदणे येथे सुरू असलेल्या अखंड हरीनाम सप्ताहाच्या पाचव्या दिवशी ह.भ.प. अशोक महाराज शिंदे (आणे) यांच्या प्रभावी आणि विचारप्रवर्तक कीर्तन उपदेशाने भाविकांना अंतर्मुख केले. समाजातील वाढता नैतिक ऱ्हास, शिक्षणातील संस्कारांची कमतरता आणि शैक्षणिक बाबतीत महत्त्वाचे उपदेश महाराजांनी केले आहे. कीर्तनादरम्यान त्यांनी केलेले एक विधान विशेष गाजले शाळेत नसणारे ग्रंथ न्यायालयात ठेवले जातात न्यायालयातील गीता जर शाळेत आली, तर कोर्टात जाण्याचीच वेळ येणार नाही.



हे विधान करताना महाराज म्हणाले की, गीतेतील मूल्ये, सत्य, धर्म, कर्तव्य आणि विवेक या गोष्टी शिक्षणात रुजल्या तर समाजातील गुन्हेगारी आपल्या मुळापासून कमी होईल. ते पुढे म्हणाले, गीता हे अत्यंत पवित्र ग्रंथ असून आज न्यायालयात शपथ-विधीसाठी त्याचा उपयोग होतो. पण तोच ग्रंथ जर मुलांच्या मनात रुजला, शालेय शिक्षणात आला, तर न्यायालयांचे दरवाजे ठोठावण्याची वेळच येणार नाही. कारण संस्कार आणि समज वाढली की चुकीचे मार्ग आपोआप दूर होतात. महाराजांनी पालकांचे संस्कार, युवावर्गाचा संभ्रम, स्वार्थी प्रवृत्तीचा वाढता प्रभाव, भक्ति आणि सदाचाराचे महत्त्व यावरही हृदयाला भिडणारे मार्गदर्शन केले. उदाहरणांसह दिलेल्या त्यांच्या उपदेशामुळे सभामंडप वारंवार टाळ्यांच्या कडकडाटाने दणाणून गेले. भक्तांनी दत्तात्रय महाराज की जय अशा घोषणांनी वातावरण अधिकच भारावून टाकले. अखंड हरीनाम सप्ताहात दररोज वाढत चाललेली भाविकांची उपस्थिती आणि उत्सवातील अध्यात्मिक वातावरणामुळे दत्तजयंती साजरी करण्याचा आनंद अधिकच द्विगुणित झाला आहे.

# सराफी दुकानात बनावट रिंगची अदलाबदल; उच्चशिक्षित चोरटा जेरबंद

**पुणे । प्रतिनिधी**

**एक उच्चशिक्षित चोरट्याला विमानतळ** पोलिसांनी अटक केली आहे. सराफी दुकानात खरेदीचा बहाणा करून बनावट अंगठी ठेवत दुकानातील सोन्याची अंगठी चोरण्याची त्याची पद्धत अखेर सीसीटीव्हीच्या मदतीने पोलिसांच्या हाती लागली. सैफ दिलीप बेळगावकर (वय २९, रा. केदारेनगर, वानवडी, मूळ रा. सांगली) असे अटक केलेल्या चोरट्याचे नाव आहे.

बेळगावकर हा उच्चशिक्षित असून, पूर्वी आयटी कंपनीत नोकरीला होता. सध्या तो हॉटेल व्यवसायात आहे. आर्थिक स्थिती चांगली असूनही तो चोरीकडे वळला. त्याने अशा पद्धतीने आणखी काही सराफी व्यावसायिकांना गंडा घातला असून, त्यादृष्टीने तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. याबाबत २१ वर्षीय तरुणाने विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसात वाजता विमाननगर येथील नामांकित ज्वेलर्समध्ये ही घटना घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी २६ नोव्हेंबर रोजी दुकानात काम करत असताना एक रिंग बनावट असल्याचे मॅनेजर यांनी निदर्शनास आणून दिले. त्यानंतर सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले, असता २३ नोव्हेंबरला एक तरुण पांढरी हुडी व काळी पँट घालून दुकानात येताना दिसला. रिंग पाहताना तो फोनवर बोलत असल्याचे भासवत ट्रेमधील ८ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी चोरून तिथे स्वतःजवळील खोटी अंगठी ठेवून गेल्याचे दिसून आले. याबाबत गुन्हा दाखल होताच विमानतळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक गोविंद जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक नितीन राठोड यांच्या पथकाने सीसीटीव्हीच्या आधारे आरोपीचा माग काढला. त्यादरम्यान औंधमधील एका सराफी दुकानात तो येणार असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यावेळी सापळा रचून पथकाने बेळगावकर याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे केलेल्या तपासात त्याने गुन्ह्याची कबुली दिली. परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त सोमय मुंडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोविंद जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक नितीन राठोड, मनोज बरुरे, अंमलदार योगेश थोपटे, ज्ञानेश्वर आवारी, रूपेश पिसाळ, शैलेश नाईक, दादासाहेब बर्डे, हरिप्रसाद पुंडे यांच्यासह पथकाने ही कारवाई केली.

# फाकटे येथे येथे विहिरीत पडलेला बिबट्या अखेर सुखरूप बाहेर; वनविभागाचा थरारक रेस्क्यू

**शिरूर । प्रतिनिधी**

फाकटे (ता. शिरूर) येथे बुधवारी (दि. ३) पहाटे एका विहिरीमध्ये पडलेल्या बिबट्याला वनविभागाच्या रेस्क्यू टीमने अत्यंत जलद आणि सुरक्षितपणे बाहेर काढले. अंदाजे तीन वर्ष वयाच्या मादी संवर्गातील बिबट्याला यशस्वीरित्या बाहेर काढल्यानंतर माणिकडोह बिबट निवारण केंद्रात दाखल करण्यात आले. यापूर्वी फाकटे येथे दोन बिबट्या जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले आहे.



बुधवारी (दि. ३ ) सकाळी फाकटे येथील शेतकरी नवनाथ दत्तू शेलार हे त्यांच्या शेतातील पाण्याची मोटर चालू करण्यासाठी गेले असता, त्यांना विहिरीमध्ये बिबट्या पडल्याचे दिसले. ते पाहून नवनाथ शेलार यांनी तात्काळ गावातील सामाजिक कार्यकर्ते शंकर पिंगळे यांना फोनद्वारे या घटनेची माहिती दिली. सामाजिक कार्यकर्ते शंकर पिंगळे यांनीही परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी तातडीने वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे आणि वनरक्षक लहू केसकर यांना संपर्क साधून या घटनेची सविस्तर माहिती दिली.

या घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार महेंद्र दाते यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाची रेस्क्यू टीम तात्काळ फाकटे गावातील घटनास्थळी दाखल झाली. सुरक्षिततेची संपूर्ण काळजी घेत आणि योग्य नियोजन करून, रेस्क्यू टीमने विहिरीत पडलेल्या बिबट्याला पिंजऱ्याच्या साहाय्याने मोठ्या कौशल्याने व सुरक्षितपणे बाहेर काढले. विहिरीतून बाहेर काढल्यानंतर बिबट्याला जुन्नर येथील माणिकडोह बिबट निवारण केंद्रात पाठवण्यात आले आहे. वनविभागाचे अधिकारी आणि बचाव पथकाच्या जलद प्रतिसादाबद्दल आणि यशस्वी बचाव कार्याबद्दल परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# निमगाव दुडे येथे बिबट्या जेरबंद

**शिरूर । प्रतिनिधी**

निमगाव दुडे (ता. शिरूर) येथील कवठे येमाई रोडवर, घोड नदीच्या काठावर वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात मंगळवार (दि. २) रात्रीच्या सुमारास एक नर बिबट्या यशस्वीपणे जेरबंद झाला. सुमारे सहा ते सात वर्षे वयोगटातील या बिबट्याला माणिकडोह बचाव केंद्रात सुरक्षित स्थलांतरित करण्यात आल्याची माहिती वनरक्षक नारायण राठोड यांनी दिली.



गेल्या काही दिवसांपासून निमगाव दुडे, दुडेवाडी,टाकळी हाजी येथील खडकवस्ती व रावडेवाडी परिसरात बिबट हल्ल्यांच्या घटना वाढल्या होत्या. तसेच घोडनदीच्या दोन्ही काठांवरील गावांमध्ये बिबट्यांचे वारंवार दर्शन होत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर बिबट्यांना तातडीने जेरबंद करण्याची मागणी जोर धरत होती. दरम्यान, परिसरात ऊसतोडीचे काम सुरू असल्याने बिबटे ऊसातून बाहेर पडत असल्याची शक्यताही व्यक्त केली आहे. वनअधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळीच लावलेल्या पिंजऱ्यामुळे संभाव्य धोका टळला असून स्थानिकांनी दिलासा व्यक्त केला आहे.

# उद्यानांत अनुभवता येणार राज्यांची संस्कृती ; पुणे महापालिकेची नवकल्पना देशातील २९ राज्यांच्या संस्कृतीवर आधारीत उद्यानांचा आराखडा

**पुणे । प्रतिनिधी**

पुणेकरांसह देशभरातून येणाऱ्या पर्यटकांना वेगवेगळ्या राज्यांची संस्कृती एका ठिकाणी अनुभवता यावी, यासाठी पुणे महापालिका देशातील २९ राज्यांच्या संस्कृतीवर आधारीत उद्याने उभारण्याचा आराखडा तयार करत आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. शहरातील अनेक उद्याने जुनी झाल्याने ती पुनर्विकसित करण्याचे कामही सुरू असून, ही उद्याने अनोख्या संकल्पनेवर उभारण्यासाठी शहरातील कला महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांची मदत घेतली जाणार आहे.



सध्या, महापालिकेची २२० पेक्षा अधिक उद्याने असली तरी अत्यल्प उद्यानेच वेगळ्या संकल्पनांवर आधारीत असल्याने पर्यटकांची गर्दी त्या ठराविक ठिकाणीच होते. शहराच्या पर्यटनाला चालना देण्यासाठी सार्वजनिक ठिकाणे आणि मुख्य चौकांचे सुशोभीकरण करण्याचे निर्देशही आयुक्तांनी बैठकीत दिले. या बैठकीत अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, शहर अभियंता प्रशांत वाघमारे आणि मुख्य उद्यान अधीक्षक अशोक घोरपडे उपस्थित होते. आयुक्त राम म्हणाले की, शहरातील सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता आणि आकर्षकतेचा अभाव स्पष्टपणे जाणवतो. त्यामुळे शहराचे सुशोभिकरण आणि संकल्पनाधारित उद्याने वाढविणे आवश्यक आहे. सध्या, फक्त पु. ल. देशपांडे उद्यान हे अनोख्या संकल्पनेवर आधारित असून त्याच धर्तीवर नवी उद्याने उभारण्याचा महापालिकेचा मानस आहे. यामुळे पर्यटकांना देशातील विविध राज्यांची संस्कृती एका ठिकाणी अनुभवण्याची संधी मिळणार आहे.